प्रकारची संकटे आणली असती आणि म्हणूनच त्यांना ब्राह्मणांची सोंगे घेऊन दिवस कंठावे लागत होते.

अशी गावामागून गावे हिंडता हिंडता त्यांना बातमी लागली की, पांचाळ नगरीत द्रुपद राजाने आपल्या मुलीचे स्वयंवर मांडले आहे. त्यावर भीमाने धर्माला विचारले,

" दादा, आपण जायचं का तिकडे ? खूप गंमत पाहायला मिळेल. "

धर्म म्हणाला,

" तुमची सर्वांची इच्छा असली, तर जाऊ या."

मग ते सगळे तिथून सरळ पांचाळ देशाच्या वाटेने निघाले. मजल दरमजल करीत त्या नगरात पोचले. पुढे प्रश्न निघाला की, ' नगरात आलो खरे, पण राहायचे कोणाकडे ? '

कोणी जागा देईल का, याची चौकशी करीत ते एका कुंभाराच्या आंगणात आले. त्याच्या ओसरीला जागा होती आणि पांडवांना ती पसंत पडली होती. धर्माने त्या कुंभाराला विचारले,

" कुंभारदादा, आम्ही परदेशी पाहुणे आहो. या नगरात काही दिवस आम्हांला राहायचं आहे. तू आम्हांला जागा देशील का ? "

त्यावर तो कुंभार म्हणाला,

" जागा देईन. पण फुकट देणार नाही. त्यासाठी काम करावे लागेल. माझा आहे गाडगी-मडकी घडवण्याचा धंदा.

मला त्यासाठी खूप खूप माती लागते. तुम्ही मला माती आणून द्यायला मदत कराल तर मी तुम्हांला जागा देईन."

ते ऐकून धर्माने भीमाकडे पाहिले. कारण पाचही भावांत तोच चांगला तगडा गडी होता. असली अंगबळाची कामे म्हणजे त्याच्या हातचा मळ होता. धर्माने आपल्याकडेच का पाहिले ते त्याला समजले आणि तो कुंभाराला म्हणाला,

"मातीबद्दल तू काळजी करू नको. मी तुला हवी तेवढी माती आणून देईन."

लगेच भीमाने धोतराचा काचा मारला. उपरणे कमरेला बांधले. एकवार शड्डू ठोकला. मारुतीसारखा हुंकार गाजवला आणि तो दणादणा धावत नदीकडे निघाला. त्याच्या त्या दणदणाटाने आजूबाजूची झाडेमाडे थरथर कापली. पाखरे भयाने घरट्यात लपली.

भीम नदीच्या किनाऱ्यावर पोचला. आणि माती शोधू लागला. नदीच्या दुसऱ्या तीरावर उंच दरड होती. तिथे मातीच माती होती. पण भीमाजवळ कुदळही नव्हती किंवा फावडेही नव्हते. आता काय करावे ? म्हणून क्षणभर तो विचारात पडला. एवढ्यात त्याला युक्ती सुचली. तो ती दरड चढून तिच्या माथ्यावर गेला आणि त्याने दरडीवर एक जबर-दस्त लाथ मारली. त्यासरशी ती दरड उभीच्या उभी कोसळली. भसाभसा माती खाली पडली. तो आपला पराक्रम पाहून भीम असा काही प्रचंड हसला की, त्या हसण्याच्या दणक्याने त्या दरडीचा उरलासुरला भाग होता, तोही कोसळून पडला.

मग भीमाने मारुतीसारखी तिथूनच खाली उडी ठोकली. त्या मातीच्या ढिगावर दोन्ही हातांनी भसाभसा पाणी शिंपले. मग त्याने ती माती नाचून नाचून तुडवली. तिच्यातला कण अन् कण बारीक करून, ती एकजीव केली. मग तिचा घट्ट गोळा बनवला. तो डोंगराएवढा मातीचा गोळा दोन्ही हातांनी डोक्यावर उंच धरून भीम जसा काही वादळवाऱ्यासारखा सुसाट धावत धावत



भीमाने मातीचा डोंगर कुंभाराच्या आंगणात आदळला.

कुंभाराच्या घरी आला. त्याने तो मातीचा डोंगर कुंभाराच्या आंगणात आदळून त्याला म्हटले,

" कुंभारदादा, घे तुझी माती. आता हवी तितकी गाडगी-मडकी बनव."

कुंभार ती आंगणभर चिकट गुळगुळीत माती पाहून खूप

झाला. त्याला वाटले, की भीमाला खूप श्रम झाले असतील. त्याला भूकही सपाटून लागली असेल. म्हणून त्याने भीमाला आपल्या मागून बोलावले आणि त्याला आपल्या कोठीघरात नेऊन उभे केले. तो भीमाला म्हणाला,

" भटजी महाराज, ही इथे चण्यांची पोती आहेत. त्यापलीकडे गुळाच्या ढेपा आहेत. तुम्हांला हवे तेवढे चणे आणि गूळ खा. "

कुंभार एवढे सांगून बाहेर आला अन् गाडगी–मडकी बनवण्याच्या कामाला लागला. थोड्याच वेळात भीम बाहेर येऊन धर्माला म्हणाला,

" दादा, माझी भूक काही भागली नाही. मी आता माधुकरी मागायला जातो. "

कुंभाराला भीमाच्या या बोलण्याचा अचंबा वाटला. तो तसाच मातीचे हात घेऊन आपल्या कोठीघरात गेला. त्याला वाटले होते की हा माणूस खाऊन खाऊन किती खाईल ? फार तर दोनचार शेर चणे अन् नारळाएवढा गुळाचा खडा. पण आत जाऊन पाहतो, तर सगळी कोठी रिकामी ! खंडीभर चण्यांचा फडशा अन् गुळाच्या ढेपांची उतरंडही फस्त ! मुंगीला तरी कणभर मिळेल इतकासुद्धा गूळ शिल्लक नाही. कुंभाराला हे सगळे अद्‌भुत वाटले अन् तो मटकन् खालीच बसला ! त्याने म्हटले,

" अरे, हा माणूस आहे का राक्षस ! "

कुंभार रागारागाने बाहेर आला. पण त्याला भीमापुढे

बोलायची छातीच होईना. त्याने मग आपला राग त्याच्या गाडग्या-मडक्यांवरच काढला. भीमाने त्याच्या त्या रागाकडे लक्षच दिले नाही. तो धर्माला म्हणाला,

" दादा, मी चाललो माधुकरीला. तुम्हाला सगळ्यांनाच भुका लागल्या असतील. आता येतो माधुकरी घेऊन."

पण माधुकरी मागायची, तर हातात झोळी हवी होती. ती कुठे होती भीमाच्या जवळ? तो विचार करीत निघाला की, आता झोळी कशाची करायची? एवढ्यात त्याला एका जागी खूप तंबू व राहुट्या दिसल्या. त्या होत्या कौरवांच्या. दुर्योधन, दुःशासन वगैरे सगळे कौरव द्रौपदीच्या स्वयंवरासाठी आले होते अन् द्रुपद राजाने सुंदर तंबू घालून त्यांत एकेकाची राहण्याची सोय केली होती. त्या तंबूत बसून ते कौरव खात होते, पीत होते, मजा करीत होते.

भीमाचा मुळापासूनच दुःशासनावर राग. भीम त्याची खोडी काढायचा प्रसंग कधीच वाया जाऊ देत नसे. आताही त्याला तीच लहर आली. तो बघत बघत दुःशासनाच्या तंबूकडे गेला अन् त्याने टर्रदिशी त्याच्या तंबूची कनात फाडली. चांगला घोंगडीएवढा तुकडा टरकावला. दुःशासनाला आला संताप. त्याला वाटले की, या भस्म लावलेल्या भटाला चांगले जमिनी-वर लोळवावे. तो अस्तन्या सारून पुढे येतो, तर भीम आपली मूठ आवळून त्याच्यापुढे उभा. त्याचे ते लाल लाल डोळे अन् ती वज्रासारखी मूठ पाहून दुःशासनाची बोबडीच वळली. तो मारा-मारीला पुढे येण्याच्याऐवजी मागच्या मागे पसार झाला.

त्याची उडालेली ती गाळण पाहून भीम एकदा खदखदून हसला. त्याच्या त्या हसण्याने त्या सगळ्या तंबू-राहुट्या गद-गदा हादरल्या. भीमाने मग त्या फाडलेल्या कनातीची झोळी बनवली. अन् ती आपल्या खांद्याला लादली. तो तिथून पुढे निघाला. आता त्याला हवा होता एक दांडा ! पुढे जाता जाता त्याला एक ताडमाड दिसला. उंच अन् सडेसोट. भीमाने दोन्ही



भीमाने दुःशासनाच्या तंबूची कनात टर्रदिशी फाडली.

हातांची कव घालून तो ताडमाड मुळासकट उपटला. त्याचा बुडखा साफ केला. शेंडा खुडून टाकला अन् त्याचा दांडा बनवला. डाव्या खाकेला झोळी अन् उजव्या हातात दांडा ! भीमसेन माधुकरी मागणारा ब्रह्मचारी बनला. पुढे जाता जाता जी एक गल्ली दिसली, त्या गल्लीत तो शिरला. त्याने एका चौसोपी वाड्यापुढे उभे राहून मोठ्याने आरोळी दिली—

" ॐ भवति भिक्षां देहि । "

त्या वाड्यातल्या स्वैंपाकघरातून पक्वान्नांचा अन् तळणा-वळणाचा खमंग वास बाहेर येत होता. त्या वासाने भीमाच्या तोंडाला पाणी सुटले. त्याला वाटले, की इथे आपल्याला चांगली माधुकरी मिळणार ! बऱ्याच दिवसांनंतर आज आपल्याला चमचमीत जेवण मिळणार !

पण घरमालक बाहेर आला अन् भीमाला म्हणाला,

" ए भिक्षेकऱ्या ! आमच्या घरची जेवणं–खाणं आटपली बरं का. आता काही शिल्लक नाही ! तू जा पुढच्या घरी."

भीमाला वाटले की, हा माणूस सपशेल खोटे बोलतो आहे. जेवणे–खाणे आटपली तर हा खमंग वास बाहेर पसरला आहे तो कसला ? त्याच्या हातात दांडा होताच. तो त्याने समोरच्या भिंतीत खुपसला. तोफेच्या गोळ्याने तटाला खिंडार पडावे, तसा त्या दांड्याने भिंतीला भला मोठा भोसका पडला. त्या खिंडारातून भीमाला दिसले की, घरात पाने वाढलेली आहेत अन् चुलीजवळच्या परातींत पक्वान्नांची रास उभी आहे. ते पाहून तो त्या घरमालकाला म्हणाला,

" खोटं बोलता होय मालक ? बऱ्या बोलानं त्यांतली एक परात माझ्या झोळीत आणून टाका. नाही तर आणखी एकदा दांडा घालतो अन् सगळ्या जेवणाचा चेंदामेंदा करून टाकतो."

तो मालक कापत कापत घरात गेला. त्याने गोड घारग्यांची एक परात आणून भीमाच्या झोळीत पालथी केली. भीम जाता जाता त्याला म्हणाला,

" पुन्हा असं खोटं बोलू नका. खोटं बोलणं हे पाप आहे, समजलं ? "

भीम तिथून पुढच्या घरी गेला. ते घर एका म्हातारीचे होते. ती म्हातारी अनाथ होती. एकटी होती. गरीब होती. भीमाने ' ॐ भवति ' म्हणून आरोळी देताच ती तव्यावरची गरम गरम अर्धी भाकरी घेऊन बाहेर आली. भीमाकडे पाहून तिने म्हटले,

" बाबारे, तू धष्टपुष्ट गडी आहेस. माझी ही अर्धी भाकरी तुझ्या दाढेलासुद्धा पुरायची नाही.......पण काय करू ? मी एकच भाकरी केली होती. त्यातली अर्धी तुला वाढते. "

म्हातारीचे कनवाळूपणाचे बोलणे ऐकून भीम तिला म्हणाला,

" आजीबाई, तू मुळीच वाईट वाटून घेऊ नको. तुझी ही अर्धी भाकरी मला शंभर भाकऱ्यांच्या मोलाची आहे. ही खाऊन माझे पोट नक्की भरेल. "

म्हातारीला भीमाचे ते बोलणे खूप आवडले. ती त्याला म्हणाली,

" तू या आळीत सगळीकडे माधुकरी माग. पण पलीकडे उग्र नावाच्या पुरोहिताचं घर आहे, तिथे मात्र जाऊ नको. "

" का जाऊ नको आजी ? " भीमाने विचारले.

" मी सांगते म्हणून. " म्हातारी म्हणाली.

" पण कारण काय ते सांग ना ! " भीम म्हणाला.

" अरे, तो पुरोहित मोठा दुष्ट आहे. त्याच्या दारी कोणी

भिक्षा मागायला गेलेलं त्याला आवडत नाही. तो त्याला मारून, पिटून, थोटा-लंगडा करून कवाडाच्या बाहेर घालवतो." म्हातारीने समजावून सांगितले.

" एवढंच ना ? मी बघतो त्याला. " भीम म्हणाला.

तो म्हातारीच्या घरून निघाला तो सरळ त्या उग्र पुरोहिताच्या आंगणात जाऊन उभा राहिला. ' ॐ भवति ' म्हणून त्याने खूप मोठ्यांदा गर्जना केली. तो पुरोहित अन् त्याची बायको, दोघे मिळून कुभांड रचीत आणि आलेल्या भिक्षेकऱ्याला बडवीत.

दारी आलेला पाहुणा तरणाताठा अन् गोरागोमटा आहे, हे पाहून पुरोहिताच्या बायकोने ठरवले, की याला चांगला खरपूस मार देऊन हाकलायचे. पुरोहिताच्या आधी ती बाहेर आली. भीमाच्या जवळ गेली अन् त्याच्यापुढे आडवी पडून ओरडू लागली,

" धावा हो धावा ! मला या भिक्षेकऱ्यानं मारलं हो. कसा मेला धटिंगण आहे पाहा ! भीक मागायला आला अन् मला की हो मारलंन ! "

आणि ती बाई मोठमोठ्याने गळा काढून रडू लागली. भीमाला हा काय प्रकार आहे ते क्षणभर कळेच ना. तो गोंधळून गेला. त्याला त्या खोटारड्या बाईचा खूप राग आला. पण करायचे काय ? ती पडली बाई !

तिचे रडणे—ओरडणे ऐकून उग्र पुरोहित घरातून धावतच बाहेर आला. त्याच्या हातात तलवार होती.

" कोण तुला मारतो बघू दे. या तलवारीनं त्याची खांडोळीच करून टाकतो. " पुरोहित गरजला.

पुरोहिताच्या हातातील तलवार दिसताच भीमाचे पित्त खवळले. त्याने वाघासारखी झडप घालून पुरोहिताच्या हातातली तलवार हिसकून घेतली. एका क्षणात पुरोहित निःशस्त्र झाला.



भीमाने पुरोहिताला गरागरा फिरविले.

दुसऱ्या क्षणाला तो भीमाच्या तावडीत सापडला. भीमाने त्याच्या पोटकुळात हात घालून त्याला उंच उचलले व गरागरा आपल्या भोवती फिरवले. तेवढ्यानेच पुरोहिताचे डोळे पांढरे झाले.

" देऊ का फेकून त्या पलीकडच्या शेणाच्या खड्ड्यात ? " भीमाने विचारले.

" नको, नको ! मला खाली उतरव. " पुरोहित गयावया करू लागला.

" पुन्हा कधी दारात येणाऱ्या अतिथीला त्रास देशील का ? " भीमाने विचारले.

" नाही, कधी नाही." पुरोहित म्हणाला.

" तू मोठा श्रीमंत दिसतोस." भीमाने म्हटले.

" देवाच्या दयेने थोडाबहुत आहे." पुरोहित म्हणाला.

" मग आजपासून दारात येणाऱ्या गोरगरिबांना घासभर अन्न घालशील की नाही ? " भीमाने विचारले.

" घालीन, घालीन ! पण मला खाली उतरव. असा अधान्तरी गरगर फिरवू नको." पुरोहिताने भीमाला विनवले.

भीमाने त्याला खाली उतरवून आपल्यापुढे उभे केले. तरी पण पुरोहिताचे कापरे काही थांबले नाही. त्याला भीमाच्या डोळ्याला डोळा देववेना अन् तिथून पळूनही जाता येईना. त्याची बायको तर नुसती ' आ ' वासून उभी राहिली होती.

पुरोहिताच्या दारात पिकलेल्या पिवळ्याधमक आंब्यांची गाडी भरलेली होती. स्वयंवरासाठी पांचाळ नगरात आलेल्या कौरवांना मेजवानी देण्यासाठी त्याने ते गाडीभर रसाळ आंबे आणले होते. तो कौरवांना आम्ररसाने तृप्त करून त्यांच्याकडून दक्षिणा म्हणून सोन्याची नाणी उपटणार होता. त्या दक्षिणेने पूर्वीपेक्षा अधिक श्रीमंत होणार होता. भीमाने त्या गाडीकडे पाहून पुरोहिताला विचारले,

" आता मला काय भिक्षा वाढतोस ? बोल."

" त्या गाडीतले चार आंबे याच्या झोळीत टाक." पुरोहिताने आपल्या बायकोला फर्माविले.

" मला फक्त चारच आंबे ? मग या गाडीभर आंब्यांचं काय करणार आहेस ? " भीमाने विचारले.

" हस्तिनापूरचे कौरव सम्राट आज माझ्या घरी जेवायला येणार आहेत." पुरोहित जरा छाती फुगवून बोलला.

ते ऐकून पुन्हा भीमाच्या कपाळाची शीर फुगली. " कौरवांना मेजवानी देणार आहेस काय ? " भीम दात-ओठ खाऊन बोलला. मग त्याने एका क्षणाचाही विलंब लावला नाही. तो सरळ रस्त्यावर गेला. त्याने त्या गाडीची धुरा दोन्ही हातांनी कचदिशी उचलली आणि भीम ती भरलेली गाडी ओढीत दणादण धावू लागला.

" अरे, तू हे काय करतोस ? माझी गाडी कुठे नेतोस ? " पुरोहिताने पाठीमागून आरडा—ओरडा सुरू केला. पण पुढे होऊन भीमाला अडवण्याची त्याला छाती झाली नाही. भीमाने ती गाडी ओढीत थेट कुंभाराच्या दारात आणून उभी केली. सकाळी मातीचा डोंगर आणला, तर आता आंब्यांची गाडी आणली. कुंभार त्या गाडीकडे बघतच राहिला. भीमाने रस्त्यातूनच ओरडून कुंभाराच्या बायकोला म्हटले,

" कुंभारीणकाकू ! ने हे आंबे घरात अन् तुझ्या मुलांबाळांना पोटभर आमरस काढून वाढ."

त्या दिवशी दुपारी कुंभाराच्या घरी पिवळ्या जर्द आमरसाचा झकास बेत बनला. पुरोहिताच्या घरी मेजवानी झोडायला आलेल्या कौरवांना मात्र गुळाच्या खड्याबरोबर पोळी खावी लागली !

♣ ♣

म. ग्रं. स. गर्दे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २८२८
दिनांक

# मंगलभाट

फार जुन्या काळची गोष्ट आहे. दिल्लीमध्ये एक भाट राहात होता. त्याचे नाव होते मंगलभाट. राजांच्या वंशावळी ठेवायच्या अन् दरवर्षी राजाला त्याची वंशावळ वाचून दाखवून त्याच्याकडून बिदागी मिळवायची, हा भाटांचा धंदा असे.

मंगलभाटही तेच करीत होता. पण त्याला जे द्रव्य मिळे, तेवढ्यावर त्याचा संसार चालत नसे. त्याच्या घरात सदैव ओढघस्त असायची. पीठ आहे तर मीठ नाही अन् मीठ आहे तर तेल नाही, असा प्रकार चालायचा.

मंगलभाट या दारिद्र्याला कंटाळला. गिरनारचा राजा कैवाट याची कीर्ती त्याने ऐकली होती. तो राजा मोठा दानशूर होता. एखाद्याला द्यायचे तर तो ओंजळी भरभरून देत असे. मंगल-

भाटाजवळ त्या राजाची वंशावळ होती. पण तो कधी त्या राजाकडे गेलाच नव्हता. कुठे दिल्ली अन् कुठे गिरनार! दोहोंमधले अंतर फार. त्यामुळे मंगलभाटाचे तिकडे जाणे जमले नव्हते. पण आता मात्र त्याने ठरवले की, कितीही दिवस लागोत आणि प्रवासात कितीही हाल होवोत, आपण कैवाट राजाकडे जायचेच. त्याच्याकडून एकदा दान मिळाल्यावर मग जन्मभर कुठे जावे लागणार नाही आणि कशाची कमतरता भासणार नाही. हा विचार पक्का झाल्यावर त्याने आपल्या वाण्याला सांगितले,

" मी प्रवासाला जातो आहे. परत यायला बरेच दिवस लागतील. तोवर तू आमच्या घरी सामान दे. घरच्या मंडळींना उपाशी पडू देऊ नको. मी परत आलो, की तुझे होतील ते पैसे देऊन टाकीन. "

वाणी ' बरे ' म्हणाला.

मंगलभाटाने प्रवासाची तयारी केली. तो दान मागायला निघतो आहे, असे पाहून त्याचे चौघे-पाचजण सगेसोयरेही त्याच्याबरोबर निघाले.

ही मंडळी जाता जाता एका गावात पोचली. त्यांना रात्री कोणाच्या तरी घरी मुक्काम करायचा होता. तशी आपली सोय कुठे होईल म्हणून ते बाजारात फिरून चौकशी करू लागले. पाहुणे नवखे दिसतात, म्हणून गावातल्या काही टवाळखोरांनी त्यांची फजिती करायचे ठरविले. त्यांच्यापैकी एकजण पुढे येऊन मंगलभाटाला म्हणाला,

" भाटजी, आमच्या गावात सांगागौड नावाचा एक माणूस

आहे. तो दयाळू आहे. उदार आहे. तो आल्यागेल्याला जेवायला घालतो. त्याचे आदरातिथ्य उत्तम करतो."

मंगलभाट ते ऐकून खूष झाला. शोध करीत करीत सांगा-गौडाच्या घरी गेला.

पण सांगागौड हा कोणी गृहस्थ नव्हता किंवा श्रीमंतही नव्हता. तो होता एक गुराखी. गावातल्या लोकांची गुरे रानात चारायला नेऊन तो आपले आणि आपल्या म्हाताऱ्या आईचे पोट भरीत असे.

मंगलभाट आपल्या सोबत्यांसह तिन्हीसांजा त्याच्या दारात जाऊन उभा राहिला. सांगागौड घरी नव्हता. रानातून घरी यायला त्याला अजून अवकाश होता. घरात होती ती त्याची म्हातारी आई. मंगलभाटाने तिला विचारले,

" बूढी माँ, सांगागौडाचे घर हेच का ? "

त्यावर बूढी माँ म्हणाली,

" होय, हेच. तुम्हांला काय हवं ? "

" आम्ही भाट आहो. आम्हांला रात्री इथे मुक्काम करायचा आहे. गावातले लोक म्हणाले की, तुम्ही सांगागौडाच्या घरी चला. तिथे तुमची चांगली व्यवस्था होईल."

म्हातारीला वाटले की, गावच्या लोकांनी या परदेशी पाहु-ण्यांची थट्टा केली आणि आपल्यावर संकट घातले. पण तिने विचार केला की, काही झाले तरी या लोकांची सोय करायलाच हवी. घराची अब्रू जाता कामा नये, म्हणून तिने मंगलभाटाला बसायला बाज दिली, प्यायला पाणी दिले आणि ती मागच्या

दारातून बाहेर निघाली. शेजारच्या चार घरी जाऊन तिने कणीक, डाळ, गूळ, तूप वगैरे जिन्नस मागून आणले. उत्तम स्वैंपाक केला. भाट मंडळींना पोटभर जेवायला वाढले. एवढ्यात बाहेर सांगागौडाची चाहूल लागली. त्याबरोबर म्हातारी धावत बाहेर आली. ती आपल्या मुलाला म्हणाली,

" सांगा, भाट मंडळी घरात जेवत आहेत. मीच सांगागौड असे तू त्यांना सांगू नको. खरी गोष्ट त्यांना कळली तर आपण गरिबाच्या घरी पोटभर खाल्ले म्हणून त्यांना दुःख होईल."

सांगा म्हणाला, " ठीक आहे. "

तो घरात गेला तशी मंगलभाटाने विचारले,

" सांगाजी तुम्हीच ना ? "

" छे छे ! मी कुठला सांगाजी. मी त्यांचा गुराखी आहे. सांगाजी गेले आहेत दिल्लीला. त्यांना बादशाहाने कसल्या तरी महत्त्वाच्या कामासाठी बोलावले आहे. जाताना मला सांगून गेले होते, घरी कोणी आलं, तर त्यांचं चांगलं आतिथ्य कर. "

पण मंगलभाट काही मूर्ख नव्हता. त्याला खरी गोष्ट कळायला वेळ लागला नाही. त्याला सांगाचे नि त्याच्या म्हाताऱ्या आईचे कौतुक वाटले. दुसऱ्या दिवशी तिथून निघताना मंगलभाट गावातल्या त्या टवाळांना भेटला अन् म्हणाला,

" तुम्ही आम्हांला घर चांगलं दाखवलंत. सांगा आणि त्याची आई ही माणसं धनानं श्रीमंत नसली तरी मनानं श्रीमंत आहेत. सांगाचं घर हे तुमच्या गावाचं भूषण आहे. "

मंगलभाट तिथून पुढे निघाला. त्याला पुढे शामजीचे राज्य लागले. त्या राज्यात दुष्काळ पडला होता. लोक हवालदिल झाले होते. मंगलभाटाला तिथे एक दिवस राहायचे होते. तो मनात म्हणाला, इथे आपण शहरात राहून कुणाला त्रास देऊ नये. आपण सरळ सरळ राजवाड्यात जावे.


मंगलभाट आपल्या सोबत्यांसह राज्यात आला आहे, हे शामजी राजाला कळले. तो राजा मोठा चिक्कू. त्याला वाटले की, आली पीडा ! हे भाट लोक आता राजवाड्यात आठ दिवस राहतील. तिन्ही त्रिकाळ लाडू–पोळ्या खातील आणि जाताना दान मागतील. कमी दिलं तर हटून बसतील. तेव्हा त्याने मग प्रधानाला बोलावून आणले आणि भाटाची पीडा कशी टाळायची ते त्याला विचारले. त्यावर प्रधान म्हणाला,

" तुम्ही मेल्याचे सोंग करा. तुमच्या राण्या ऊर पिटून रडत बसू देत. आम्ही दारात तुमची तिरडी तयार करायला लागतो. भाट आले तर हा सगळा देखावा पाहून ते घाबरतील आणि पळून जातील."

राजाने त्याप्रमाणे मेल्याचे सोंग केले. राण्या रडू लागल्या. प्रधान आणि इतर मंडळी तिरडी तयार करू लागली. मंगलभाटाने हे सगळे पाहिले. तो प्रधानाला म्हणाला,

" प्रधानजी, एक वेळ मला राजाचे अखेरचे दर्शन घेऊ द्या. राजा मोठा उदार होता. गरीबांचा पोशिंदा होता. मी एकवार त्याला नमस्कार करीन आणि निघून जाईन."

प्रधानाने बरे म्हटले. मंगलभाट राजाच्या महालात गेला. तिथे राजा मेल्याचे सोंग करून पडून राहिला होता. मंगलभाट आत येताच त्याने श्वाससुद्धा रोखून घेतला. पण मंगलभाटाला त्याचे सोंगढोंग कळायला उशीर लागला नाही. तो म्हणाला,



मंगलभाटाने राजाचे ढोंग ओळखले.

" महाराज, फार दुःख होतंय मला. भाटाला दक्षिणा द्यावी लागेल म्हणून तुम्ही मरण पत्करलंत. केवढे शूरवीर तुम्ही ! मी तुमच्यावर पोवाडा रचीन आणि तो गावोगाव फिरून गाईन. माझ्या पोटाला काही कमी पडणार नाही."

असे म्हणून मंगलभाट तिथून निघून गेला. त्याच्या पाठोपाठ शामजी राजा उठून बसला. त्याला वाटले की, आपली युक्ती फसली. मंगलभाटाने आपले कपट ओळखले. तो आता

गावोगाव फिरून आपली नाचक्की करील. छे ! याच्यावर काही तरी उपाय केलाच पाहिजे.

शामजी राजाने नोकराला बोलावले आणि तबेल्यातून आपला घोडा आणायला सांगितले. त्याने शिकाऱ्याचा वेष केला आणि तो घोड्यावर चढला. एवढ्यात मंगलभाट पुढच्या गावाला जाण्यासाठी कोसभर चालून गेला होता. राजा दुसऱ्या बाजूने दौडत पुढे गेला आणि उलट्या दिशेने मंगलभाटाच्या समोर आला. त्याने मंगलभाटाला विचारले,

" काय मंगलभाट ? इकडे कुणीकडे निघालास ? "

मंगलभाटाला आश्चर्य वाटले. तो मनात म्हणाला की, मी निघण्याच्या पूर्वी राजा राजवाड्यात मरून पडला होता आणि आता हा समोरून कसा काय आला ? त्याने राजाला घडलेली हकीगत सांगितली. त्यावर राजा म्हणाला,

" असं होईलच कसं ? मी तर गेलो होतो गेले दोन दिवस शिकारीला. मग मी राजवाड्यात मरून पडेनच कसा ? काही तरी घोटाळा झालाय. तुला कोणी तरी फसवलं. तू चल माझ्याबरोबर राजवाड्यात. मी तुला दक्षिणा देतो."

पण मंगलभाट त्या राजाचे बारसे जेवलेला होता. आपण जिकडे तिकडे बेअब्रू करू म्हणून राजाने हा डाव रचला आहे, हे त्याला कळून चुकले. तो राजाला म्हणाला,

" मला दक्षिणा देणारे लोक जगात खूप आहेत; पण भाटाला दान द्यावं लागेल म्हणून मरणाचं सोंग करणारा राजा मात्र

जगात तू एकटाच आहेस. तू केवढाही बनाव केलास तरी मी फसणार नाही."

असे बोलून मंगलभाट राजाच्या अंगावरून सरळ पुढे निघून गेला. जाता जाता तो गिरनारला पोचला. तिथे दानशूर कैवाट राजा राज्य करीत होता. त्याच्याकडून आपल्याला भरपूर दान-दक्षिणा मिळेल अशी मंगलभाटाची कल्पना होती. म्हणून त्याने नगराबाहेर मोकळ्या मैदानावर आपला डेरा लावला. त्याच्या-बरोबर त्याचे सोबतीही डेरा लावून बसले. आठ दिवस गेले. पंधरा दिवस गेले. एक महिना गेला. तरीही मंगलभाटाला राजाची भेट झाली नाही.

पुढे हळहळ पावसाळा सुरू झाला. शेतकऱ्यांनी लावण्या-पेरण्या केल्या. धरतीमाता हिरवीगार दिसू लागली. पावसाच्या धारांनी तिचे अंकुर वाढू लागले.

मग कैवाट राजा एक दिवस आपल्या राजवाड्याच्या गच्ची-वर आला. त्याने आजूबाजूला पाहिले. त्याला सगळीकडे हिरवे हिरवे दिसले. शेते हिरवीगार. ते मळे हिरवेगार आणि रानेही हिरवीगार. त्याला वाटले की, आपण राजवाड्यातून बाहेर पडावे आणि नगराबाहेर राजाच्या हिरवळीवर तंबू ठोकून काही दिवस रानातच आपला मुक्काम करावा.

लगेच त्याने नोकरांना तसे हुकूम फर्माविले. नगराबाहेरच्या रानात राजशाही तंबू उभारला गेला. राजा घोड्यावर बसून नगराबाहेर आला. त्याने एकवार शेतातून, रानातून फेरफटका केला आणि मग तो आपल्या तंबूत मुक्कामाला राहिला.

मंगलभाट हे सगळे पाहात होता. त्याला वाटले की राजाची भेट घ्यायला हीच वेळ योग्य आहे. तो शीघ्रकवी होता. त्याने कैवाट राजाच्या स्तुतीचा एक छानदार पोवाडा रचला आणि तो आपल्या साथीदारांसह राजाकडे गेला.

देवडीवरच्या शिपायांनी भाट आल्याची राजाला वर्दी दिली. राजाने त्याला आत बोलावले. मंगलभाट राजाला लवून मुजरा करून म्हणाला,

" महाराज, मी एक काव्य केलं आहे. आपण ते चित्त देऊन ऐकावं अशी विनंती आहे."

राजा लोडाला टेकून बसता बसता म्हणाला, " ठीक आहे ! कर सुरू."

मंगलभाट पोवाडा गाऊ लागला. त्याचा स्वर छान लागला होता. सोबती त्याच्या गाण्याला साथ करू लागले. कैवाट राजा केवढा शूरवीर आहे, केवढा कनवाळू आहे, केवढा दानशूर आहे हे सगळे तो काव्यात वर्णन करू लागला. ती प्रशंसा ऐकता ऐकता राजा क्षणाक्षणाला उत्तेजित होऊ लागला. आपल्या मिशीचे आकडे पिळू लागला. मधून मधून प्रसन्नपणे हसू लागला. एकंदरीत तो पोवाडा ऐकून राजा मंगलभाटावर प्रसन्न झाला.

त्याने नोकराला सांगून एक हत्ती आणवला. त्या हत्तीवर रेशमी भरजरी झूल घालायला लावली. हत्तीच्या गळ्यात चांदीच्या घंटा बांधल्या. त्याच्या पाठीवर हौदा चढवला. त्या हौद्यात माणिक-

मोत्ये भरली आणि मग राजा मंगलभाटाला म्हणाला,

" हा हत्ती तुला मी दान दिला आहे. याला तू घेऊन जा."

राजाने उत्तम प्रकारचे कपडे आणले आणि ते मंगलभाटाच्या अंगावर चढवले. मंगलभाट खूष झाला. त्याने त्या हत्तीकडे पाहिले. हत्तीवरच्या हौद्याकडे पाहिले. आपल्या अंगावरच्या उंची कपड्यांकडेही पाहिले. तो मनात म्हणाला, ' एवढे चांगले कपडे घालायचे, एवढ्या चांगल्या हत्तीवर बसायचे, मग डोक्यावर पगडीसुद्धा तशीच असायला नको का ? राजाने हत्ती दिला, धन-दौलत दिली, पण आपल्याला शिरपेचाची पगडी काही दिली नाही. म्हणून त्याने राजाला म्हटले,

" महाराज, तुम्ही दिलेलं दान घसघशीत आहे. पण माझं आणखी एक मागणं आहे. शिरपेचाची पगडी घातल्याशिवाय जर मी हत्तीवर बसलो तर ते शोभणार नाही. सबब तुमची पगडी तेवढी मला द्या."

त्यावर राजा म्हणाला,

" मी तुला पगडी देईन; पण माझ्या पगडीचा रुबाब, माझ्या पगडीची शान तुला माहीत आहे का ? ही पगडी घातलेलं मस्तक कोणापुढे कधीही नमत नाही. वाकत नाही."

त्यावर मंगलभाट म्हणाला,

" महाराज, तुमच्या पगडीची शान मी राखीन. मी ती पगडी घालून कोणापुढेही मस्तक झुकवणार नाही."

ते ऐकून राजा म्हणाला,

"ठीक आहे ! कर तुझं डोकं पुढं."

मंगलभाटाने मस्तक पुढे केले. आणि राजाने आपल्या डोक्यावरची पगडी शिरपेचासह त्याच्या डोक्यावर ठेवली.



कैवाट राजा आपली पगडी मंगलभाटाला देतो.

गगनात मावणार नाही इतका आनंद मंगलभाटाला झाला. तो ती पगडी घालून हत्तीवरच्या हौद्यात बसला. त्याने आपला हत्ती आपल्या गावाच्या दिशेने चालवला. मजल दर मजल करीत तो गावाच्या वेशीवर आला. त्याने तिथून आपल्या बायकोला निरोप पाठवला,

"तुझा नवरा हत्तीवर बसून आला आहे. माणिकमोत्यांची रास घेऊन आला आहे. तू त्याला ओवाळण्यासाठी मंगलारती घेऊन ये."

भाटीण जरा चमत्कारिकच होती. ती आपल्या मैत्रिणींसह माजघरात बसली होती. हा निरोप ऐकून ती म्हणाली,

" मोठा आला आहे आरती ओवाळून घेणारा. हत्तीवरून आला असला, तरी जात भिकाऱ्याचीच ना! मी नाही ओवाळणार आरती." असे म्हणत ती उठली. तिने निरोप आणणाऱ्या माणसाला सांगितले,

" माझ्या नवऱ्याला निरोप सांग. कैवाट राजाकडून दान आणलंत, यात मोठं नवल नाही. कारण तो राजा उदाराचा राजा आहे. पण कोयलापाटणचा अणतराय हा राजा महाचिक्कू आहे. त्याच्याकडून दान आणलंत तर मी तुम्हांला पंचारती ओवाळीन."

आपल्या बायकोचा हा निरोप ऐकून मंगलभाटाला रागच आला. पण त्याने म्हटले,

" ठीक आहे. अणतरायाकडून दान आणीन तरच नावाचा मंगलभाट."

आणि तो वेशीवरूनच माघारी वळला. त्याने सरळ कोयलापाटणचा रस्ता धरला. मजल दरमजल करीत तो त्या राज्यात पोचला. राजाचा दरबार भरत होता. माणसे येऊन आपापल्या जागेवर बसत होती. मंगलभाटानेही दरबारातील आपली जागा पकडली. एवढ्यात अणतराय राजा दरबारात आला. सगळे लोक मुजऱ्यासाठी उठले. मंगलभाटही उठणार होता. पण त्याच्या लक्षात आले की, आपल्या डोक्यावर कैवाट राजाची शिरपेचाची पगडी आहे. त्यासरशी तो हळूच दरबारातून मागच्या मागे निसटला.

पण ही गोष्ट राजाच्या नजरेस आल्यावाचून राहिली नाही. थोड्याच वेळात मंगलभाट आपली नेहमीची पगडी घालून दरबारात आला. मुजरा करून राजापुढे उभा राहिला. राजाने त्याला विचारले,

" काय भाटबुवा, दरबारातून हळूच निसटलात ते का? "

मंगलभाट मनात चरकला. आपले करणे राजाच्या निदर्शनास आले असेल असे त्याला वाटले नव्हते. चटकन स्वतःला सावरून घेत तो राजाला म्हणाला,

" महाराज, कसूर माफ असावी. मी दरबारात आलो खरा. पण आपल्या पूर्वजांची नामावळी माझ्या नीट लक्षात राहिली नाही. वर्णन करायची वेळ आली तर चुकू नये म्हणून बिऱ्हाडी जाऊन वही बघून आलो. "

" भाटबुवा, हे कारण खोटं आहे. मला बनवू नकोस. खरं कारण काय ते सांग. "

आता मंगलभाटाच्या पुढे पेच उभा राहिला. पण त्याने धीर करून अणतरायाला सांगितले,

" महाराज ! माझ्या डोक्यावर गिरनारच्या कैवाट राजाची पगडी होती. त्या पगडीवर त्याचाच शिरपेच होता. कैवाट राजाचे ब्रीद आहे की, तो कोण्या राजापुढे आपलं मस्तक झुकवत नाही. तेव्हा ती पगडी डोक्यावर घालून मीही तुम्हाला मुजरा करू शकत नव्हतो. म्हणून मी बिऱ्हाडी गेलो आणि पगडी बदलून परत आलो. आता आपल्या सेवेला हजर आहे. "

मंगलभाटाचे हे बोलणे ऐकून अणतरायाला राग आला. तो आपल्याशीच पुटपुटला. कैवाट राजा कोणापुढे मान लववीत नाही काय? पाहून घेईन. माझे एकाहून एक पराक्रमी असे शंभर भाऊ आहेत. बावन्न राजांना मी कैदेत टाकले आहे. कैवाट राजाचाही गर्व उतरायला मला वेळ लागणार नाही!

त्याने मग मंगलभाटाला दान देऊन त्याची रवानगी केली.

मग तो गिरनारवर चालून जाण्याची तयारी करू लागला. त्याने भेरी, नगारे वाजवले. त्यासरशी त्याचे सगळे बंधू अन् हजारो सैनिक सज्ज होऊन राजवाड्यापुढच्या मैदानात जमा झाले. अणतराय राजा त्यांना म्हणाला,

" बंधूंनो आणि सैनिकांनो! आपल्याला कैवाट राजावर स्वारी करायची आहे. गिरनार पर्वताला वेढा घालायचा आहे. या मोहिमेत मी तुमच्या आघाडीवर राहीन. हे काम फत्ते झालंच पाहिजे."

लगेच ते सैन्य गिरनारच्या दिशेने चालू लागले, गिरनारच्या पायथ्याशी सैन्याची छावणी पडली. राजाने आपल्यासाठी तंबू ठोकून घेतला. त्याने बारकाईने एकवार गिरनारच्या किल्ल्याचे निरीक्षण केले. किल्ला मोठा तगडा होता. तोफा डागूनही त्याच्या तटाला भगदाड पडणे कठीण होते. अणतराय विवंचनेत पडला. 'आता कसे करायचे! कैवाट राजा किल्ल्यावर. आपण खालून त्याच्याशी कशी लढाई करायची?'

कैवाट राजा आणि त्याचा भाचा उंगा हे दोघे किल्ल्याच्या

तटावरून फिरत होते. तिथून कैवाट राजाला सैन्याची छावणी दिसली. आपल्या किल्ल्याला घेरा पडला आहे असेही कळले. तो भाच्याला म्हणाला,

" ऊंगा, हा काय प्रकार आहे ? हे सैन्य कोणाचं ? "

त्यावर ऊंगा म्हणाला,

" मामा, हे सैन्य कोयलापाटणच्या अणतराय राजाचं आहे. तुम्हांला जिंकून पकडून नेण्यासाठी तो स्वतः सैन्य घेऊन इकडे आला आहे. तो पाहा त्याचा तंबू."

कैवाट राजाने अणतरायाच्या तंबूकडे निरखून पाहिले. तो आपल्याशीच हसला. त्याने ऊंगाला सांगितले,

" अणतरायाला माझा निरोप कळव. तू जन्मभर वेढा घालून राहिलास तरी तुझ्या हातून मी पकडला जाणार नाही म्हणावं. बऱ्या बोलानं ऊठ आणि आपल्या देशाला चालता हो. नाही तर मी चारी रस्ते रोखीन, तुझी रसद तोडीन आणि तुला इथे अन्न-पाण्यावाचून टाचा घाशीत मरायला लावीन."

कैवाटराजाचा हा निरोप ऐकून अणतरायाचे धाबे दणाणले. त्याची खात्री झाली की, कैवाटराजाशी लढाई करणे म्हणजे मरणाला आमंत्रण देणे आहे. म्हणून त्याने तावडतोब छावणी उठवली. तो आपल्या सैन्याला म्हणाला,

" पळा रे पळा, आपला जीव वाचवा."

सैन्याच्या आधी राजा पळत सुटला. घामाघूम होऊन धापा टाकीत तो आपल्या राज्यात आला. अणतराय राजा हात हाल-

वीत परत आला. त्याला लढाई मारता आली नाही, हे पाहून राज्यातल्या सगळ्या लोकांनी त्याची छी: थू: केली. लोक एकमेकांना म्हणू लागले, 'ताकद नव्हती तर गेला कशाला कैवाटराजावर चालून ? कैवाट राजा म्हणजे काय शेणामेणाचा पुतळा वाटला ह्याला ?'

नगरातले प्रजाजन पळून आल्याबद्दल आपली चेष्टा करतात, हे अनंतरायाच्या कानी आले. तो मनातल्या मनात चडफडू लागला. त्याच्या मनाने घेतले की, कसेही करून कैवाट राजाला पकडून आणायलाच हवे. म्हणून त्याने एके दिवशी दरबार भरवला आणि पैजेचा विडा ठेवला. भर दरबारात त्याने घोषणा केली की, जो कोणी कैवाटराजाला पकडून आणील त्याने हा विडा उचलावा. मी त्याला खूप मोठे बक्षीस देईन. धनदौलतीनं त्याचं घर भरून टाकीन. राज्यात त्याला मोठा अधिकारही देईन.

सुजान नावाचा राजाचा एक नोकर होता. राजाची घोषणा त्याने ऐकली. तो उठून उभा राहिला. 'कैवाटराजाला मी पकडून आणतो' अशी प्रतिज्ञा करून त्याने तो पैजेचा विडा उचलला. राजाने त्याला शाबासकी दिली.

सुजान आपल्या घरी गेला. त्याने वेष बदलून बनजाऱ्याचे सोंग घेतले. तो थोड्याच दिवसांत गिरनारला आला. छाती ताठ करून डुलत डुलत दरबारात दाखल झाला. त्याला पाहून कैवाटराजाच्या मनात कौतुक उत्पन्न झाले. त्याने विचारले,

"तू कोण आहेस ?"

"मी बनजारा आहे. मी देशोदेशी व्यापार करतो. बैलांचा आणि सार्थदारांचा तांडा घेऊन या देशातला माल त्या देशात पोचवतो. राजा, मी तुझ्या राज्यातून चाललो होतो. प्रजाजनांकडून तुझी कीर्ती ऐकली आणि म्हटलं, जाता जाता तुला एकवार भेटून जावं."

असे म्हणून सुजानने राजाला एक मोठी थैली नजर केली. ती थैली टपोऱ्या पाणीदार मोत्यांनी भरलेली होती. कैवाटराज ती मोत्ये पाहून खूष झाला. लगेच त्याने ती थैली आपल्या राणीकडे पोचती केली. मग तो सुजानला म्हणाला,

"बनजाऱ्या, तुझ्या नजराण्यानं मी प्रसन्न झालो आहे. तू माझ्या राज्यात काही दिवस राहा. मी तुला माझा मित्र मानतो. मला सारीपाट खेळायला फार आवडतं. तू रोज दरबारात ये. आपण दोघे चार घटका खेळत बसू."

सुजानने 'आज्ञा महाराज' म्हणून मान लववली. तो मनात म्हणाला, 'राजाला आपले कपट उमगले नाही, हे फार चांगले आहे. आता आपण याच्याशी गोडीगुलाबीने वागून याला विश्वासात घेतले पाहिजे. हा पुरा कब्जात आला, की मग एक दिवस याला चतुर्भुज करून कोयला पाटणला नेणे सोपे जाईल.

त्या दिवसापासून बनजाऱ्याचे सोंग घेतलेला तो सुजान रोज दरबारात येऊ लागला. तो बोलणारा फर्डा होता. त्यामुळे राजाला

तो आवडू लागला. त्या दोघांची गट्टी जमली. असे काही दिवस गेले. मग एके दिवशी सुजानने त्याच्यावर आपला पहिला कपटी प्रयोग केला.

त्या दिवशी दरबारात येताना त्याने एक ढाल आणि एक तलवार आणली होती. ढाल मोठी मजबूत होती, देखणी होती आणि तलवार तर नागिणीसारखी सळसळत होती. राजाला ती जोडी फार आवडली. दरबारातल्या प्रत्येक माणसाला वाटले की, आपणही एकदा ती जोडी हातात घेऊन बघावी. राजा मग सुजानला म्हणाला की, ' तू ही ढाल-तलवार दरबारातून एकदा फिरवून आण.' त्याप्रमाणे बनजारा ती जोडी दरबारातून फिरवू लागला. राजाच्या उजव्या अंगाला युवराज जेसा आणि भाचा ऊंगा हे दोघे बसले होते. त्या दोघांच्या पुढे ढाल-तलवार येताच ऊंगा म्हणाला की, ' ही जोडी मला हवी.' युवराज जेसा म्हणाला की, ' छट् ! तुला नाही मिळणार. ही जोडी मला हवी.' त्यासरशी त्या दोघांचे भांडण सुरू झाले. दरबारात चिकाच्या पडद्याआड राजाची राणी बसली होती. युवराज हा तिचा मुलगा होता. ती युवराजाचा कैवार घेऊन ऊंगाला म्हणाली,

" ऊंगा, युवराजाशी भांडू नकोस. त्याला हवी असताना ती ढाल-तलवार तुला मिळणार नाही."

त्यावर ऊंगा म्हणाला,

" मामी ! ढाल-तलवार या शोभेच्या वस्तू नव्हेत. युवराजाला त्या पेलणार नाहीत. त्यानं आजवर कधी तलवार मारली नाही.

तलवारीचा एक हातसुद्धा तो कधी शिकला नाही. त्याला करायच्या आहेत काय या वस्तू ?"

त्यावर राणी म्हणाली,

" तू उगाच बढाया मारू नकोस. युवराजाची बरोबरी करू नकोस. काही झालं तरी तो या राज्याचा मालक आहे. तू बोलून-चालून परका. युवराजाला हवी असलेली वस्तू तुला मिळणार नाही. "

ऊंगाला मामीच्या बोलण्याचा राग आला. तो तिथला आश्रित नव्हता तर त्या राज्याचा सेनापती होता. त्याच्या-बरोबर त्याचे कित्येक सरदारही तिथे होते. तो स्वतः निधड्या छातीचा वीर होता. आजवर त्याने कैक लढाया मारल्या होत्या. कैवाट राजाला अनेकदा यश आणि जय त्यानेच मिळवून दिला होता. तो उभा राहून राजाला म्हणाला,

" महाराज, मामीनं माझा भर दरबारात अपमान केला आहे. मला यापुढं इथं राहायचं नाही. मी चाललो. "

कैवाटराजाचे काहीएक न ऐकता ऊंगा गिरनारच्या किल्ल्या-तून बाहेर पडला. तो आपल्या देशाला निघून गेला. त्याच्या मागोमाग त्याचे सरदारही निघून गेले. त्यांच्या जाण्याने कैवाट राजाच्या सैन्याची शक्ती अर्धीअधिक खलास झाली. राजाचा जणू उजवा हात गळून पडला. सुजानचे कपटकारस्थान अर्धे यशस्वी झाले. त्याला ऊंगा आणि कैवाट राजा यांच्यात बेबनाव झालेला हवा होता. आणि तीच गोष्ट नेमकी घडली.

पुढे एके दिवशी सुजान आणि कैवाटराजा गोष्टी बोलत बसले असता सुजानने म्हटले,

" महाराज, तुम्ही आजवर कधी तीर्थयात्रा केल्या आहेत काय ? "

कैवाट राजा म्हणाला, " नाही. "

" मग ही गोष्ट चांगली नव्हे. प्रत्येक माणसाने तीर्थयात्रा अवश्य केल्या पाहिजेत. त्यामुळे फार मोठं पुण्य लागतं. "

" राज्याची जबाबदारी संभाळताना मला अन्य गोष्टी करायला फुरसतच मिळाली नाही आजवर. "

" त्याची नका काळजी करू. मी तुम्हांला एका दिवसात सगळ्या तीर्थयात्रा घडवून आणीन. माझ्याजवळ वाऱ्यासारखे धावणारे घोडे आहेत. एका घोड्यावर तुम्ही बसा, दुसऱ्या घोड्यावर मी बसतो. आपण सकाळी निघू आणि संध्याकाळी सर्व तीर्थयात्रा पुऱ्या करून राज्यात परत येऊ. "

राजा त्या गोष्टीला तयार झाला. त्याने तीर्थयात्रा करायचे ठरवले. सुजानने दोन चपळ आणि तेजस्वी घोडे राजवाड्याच्या दारात आणून उभे केले. राजा आपल्या राणीला म्हणाला की, ' मी तीर्थयात्रा करून येतो '. राजा घोड्यावर बसायला पुढे आला, तेव्हा सुजान त्याला म्हणाला,

" महाराज, घोडे फार तेज आहेत. ते चौखूर उधळले की वाऱ्यालाही मागे टाकतील. त्यासाठी तुम्ही एक गोष्ट करा. तुम्ही आपले डोळे मिटा. मी तुमच्या डोळ्यांवर सेण लावून

पट्टी बांधतो. म्हणजे तुमचे डोळे सुरक्षित राहतील. नाही तर तुम्ही आंधळे व्हाल."

कैवाटराजाने त्या गोष्टीला कबुली दिली. सुजानने त्याच्या डोळ्यांवर मेणाची पट्टी बांधली. मग दोघेही घोड्यावर स्वार झाले. सुजानचा घोडा पुढे आणि राजाचा घोडा मागे अशी त्यांची दौड सुरू झाली. राजाला आजूबाजूचे काही दिसत नव्हते. आपण कुठे जात आहो, कुठल्या दिशेने जात आहो, हेही कळत नव्हते. घोडा भरधाव निघाला आहे, एवढेच त्याला समजत होते.

हेच तर सुजानचे कपट होते. त्या साध्याभोळ्या राजाला सुजानने फसवले आणि अणतरायाच्या राज्यात आणून एका बागेत उतरवले. मग त्याने त्याच्या डोळ्यांवरची पट्टी सोडली. राजा म्हणाला,

"आपण कुठल्या तीर्थावर आलो ?"

त्यावर सुजान खो खो हसत म्हणाला,

"महाराज, तुम्ही तुमच्या कैदखान्याच्या तीर्थावर आला आहात. मी तुम्हांला फसवून अणतरायाच्या राज्यात आणलं आहे. राजाचे शिपाई आता इथे येतील आणि तुम्हांला कैद करून घेऊन जातील."

राजाला या गोष्टीचे आश्चर्य वाटले. तो सुजानला म्हणाला,

"मित्र म्हणून मी तुझ्यावर विश्वास ठेवला. तू माझा असा विश्वासघात करशील असं माझ्या मनात स्वप्नातही कधी आलं

नाही. पण मला तू एक गोष्ट सांग, मी अणतराय राजाचे काहीही वाकडं केलं नाही. असं असता तो मला कैदखान्यात का टाकणार आहे ?

त्यावर सुजान म्हणाला,

" मंगलभाटाकडून आमच्या राजाला समजलं आहे, की तू कोण्याही राजापुढे मान झुकवीत नाहीस. ही गोष्ट खरी ना ? "

" होय, मी कोण्याही राजापुढं माझी मान वाकवीत नाही."

" मग तीच गोष्ट अणतराय राजा तुझ्याकडून करवून घेणार आहे. म्हणूनच त्याने तुझ्या गिरनारच्या राज्यावर स्वारी केली होती. पण तू त्याचा तो बेत उधळून लावलास. म्हणून त्यानं मला तुझ्याकडं पाठवलं आणि जे राजाला जमलं नाही, ते मी कपटानं घडवून आणलं. तू आता आमच्या राजाचा कैदी झालास."

अशा रीतीने कैवाट राजा अणतरायाचा कैदी झाला. मग अणतरायाने एक बेत रचला. त्याने आपला दरबार भरवला. सगळे लोक दरबारात येऊन बसल्यावर त्याने दरबाराचा मुख्य दरवाजा बंद केला. त्याची दिंडी तेवढी उघडी ठेवली. मग त्याने कैवाटराजाला दरबारात आणण्याची नोकरांना आज्ञा केली. अणतरायाचा बेत असा होता की, कैवाटराजा दिंडीतून दरबारात यायचा म्हणजे त्याला मान वाकवून डोके पुढे काढावे लागेल. तसे झाले की, तोच कैवाटराजाचा मुजरा समजून दरबारातल्या सगळ्या लोकांनी टाळ्या वाजवाव्या असे त्याने

सांगून ठेवले होते. त्याप्रमाणे कैवाटराजा दरबारच्या महाद्वारात आला. आपल्याला दरबारात जाण्यासाठी केवळ दिंडीदरवाजाच उघडा आहे, हे पाहून त्याला अणतराय राजाचे कपट समजले.

पण तोही शेराला सव्वा शेर होता. तो पुढे गेला. त्याने दिंडीदरवाजाची वरची पट्टी पकडली आणि मान वाकवून डोके आत घुसवण्याच्या ऐवजी एकदम उडी मारून आपले दोन्ही पाय आत घुसवले.

त्यासरशी सगळ्या लोकांनी टाळ्या वाजवल्या. मग त्यांच्या लक्षात आले, की कैवाटराजाने आपले पाय पुढे केले आणि त्याच्या मुजऱ्याला टाळ्या वाजवण्याऐवजी आपण त्याच्या पायाला टाळ्या वाजवल्या. अणतराय राजानेही ती गोष्ट पाहिली. तोही खजिल झाला. कैवाटराजाने आपल्यावर मात केली, असे त्याला वाटले. त्याला कैवाटराजाचा खूप राग आला. त्याने नोकरांना आज्ञा केली,

"याच्या गळ्यात आणि हातापायांत साखळदंड अडकवा. याला एका लोखंडाच्या पिंजऱ्यात घाला. त्या पिंजऱ्याला फक्त हवा जाण्यासाठी एका बाजूने गज ठेवा. तो पिंजरा पाणवठ्याच्या रस्त्यावर नेऊन उभा करा आणि नगरात दवंडी पिटवा की, पाणी आणायला जाणाऱ्या प्रत्येक बाईने त्या पिंजऱ्यावर एक खडा मारावा आणि पुढे जावे."

शिपायांनी तसे केले. कैवाट राजा साखळदंडात अडकला. रस्त्याने जाणारे येणारे लोक त्याचा अपमान करू लागले.

बायाबापड्या त्याच्यावर खडे मारू लागल्या. एक रोटी आणि वाडगाभर पाणी एवढेच त्याला अन्नपाणी मिळे. त्याला पिंजऱ्यातल्या लाकडी फळ्यांवर उघड्या अंगाने झोपावे लागे. निष्कारण ओढवलेल्या या आपत्तीमुळे तो फार दुःखीकष्टी झाला. त्याला दिवसरात्र झोप येईना. तो सारखा तळमळू लागला. इथून आपली सुटका कशी होईल याची चिंता करू लागला. अशा स्थितीत दिवसांमागून दिवस गेले. महिन्यांमागून महिने गेले. पण तरीही आपल्या सुटकेचा कोणताही उपाय त्याला सापडला नाही.

इकडे गिरनारच्या किल्ल्यात कैवाट राजाच्या राणीची अवस्थाही मोठी कठीण झाली. राजा तीर्थयात्रेला म्हणून गेला तो अद्याप परत का येत नाही, या चिंतेने तिची झोप उडाली. तो कुठे आहे, कसा आहे, किती दूर आहे हे काहीही तिला कळेना. तिने देशोदेशी लोक पाठवून राजाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण कोणालाही त्याचा पत्ता लागला नाही.

अशा स्थितीत एक दिवस तिला मंगलभाटाची आठवण झाली. राणीने मग त्याला निरोप धाडला. 'असशील तसा तावडतोब निघून ये' असे त्याला कळवले. त्या निरोपासरशी मंगलभाट गिरनारला आला. मुजरा करून राणीच्या पुढे उभा राहिला. त्याने नम्रतापूर्वक विचारले,

"राणीसाहेब, मला तातडीनं बोलावायचं कारण काय?"

त्यावर राणीने राजाची सारी हकीगत मंगलभाटाला

सांगितली. सांगता सांगता तिच्या डोळ्यांत पाणी आले. मंगलभाट तिला म्हणाला,

" राणीसाहेब, तुम्ही रडू नका. मी राजाचा शोध लावतो."

मंगलभाटाच्या तावडतोब लक्षात आले की, कैवाटराजा अणतराय राजाच्या राज्यातच कैद झाला असला पाहिजे. अणतरायानेच हे कारस्थान केले असले पाहिजे. तेव्हा त्याने तिथून सरळ कोयलापाटणलाच जायचे ठरवले. त्यासाठी त्याने वेषांतर केले. तो जोगी बनला. त्याने दाढी मिशा लावल्या. गळ्यात रुद्राक्षांच्या माळा घातल्या. अंगाला भस्म फासले. अंगात भगवी कफनी घातली. हातांत बीन नावाचे वाद्य घेतले आणि ते वाजवीत तो अणतरायाच्या राज्यात पोचला. वेशीतून नगरात शिरताना देवडीवरच्या पहारेकऱ्यांनी त्याला अडवले.

" ए जोगड्या ! कुठं निघालास ?"

" कुठं म्हणजे ! जातो शहरात. शहरात गेल्याशिवाय भिक्षा कोण वाढणार मला ?"

" तुला आत जाता येणार नाही. बाहेरच्या कोण्याही माणसाला आत घ्यायचं नाही असा राजाचा हुकूम आहे."

" गरीब माणूस मी. भीक मागतो आणि पोट भरतो. मी काय राजाचं वाकडं करणार आहे ? मला फक्त आत जाऊ द्या."

" नाही, तुला आत सोडणार नाही."

" मग मी इथंच बसतो. तुम्ही भाकर-तुकडा खाल, त्यातला

मला थोडासा द्या. माझं काय ! मी बसेन तिथं राजी. पोटाला मिळाल्याशी कारण."

मंगलभाट तिथेच एका झाडाखाली बसला. बसल्या बसल्या त्याने बीन वाजवायला सुरुवात केली. त्याचे ते वाजवणे ऐकता ऐकता पहारेकरी खूप झाले. मग मंगलभाटाने त्यांच्याशी लाडी-गोडी लावली. थोड्याच वेळात त्यांनी मंगलभाटाला आत सोडले.

मंगलभाट बीन वाजवीत रस्त्यांतून हिंडू लागला. कावळ्याच्या नजरेने तो सगळीकडे पाही. जाणाऱ्या येणाऱ्याचे बोलणे कान देऊन ऐके. दिवसभर हिंडावे, भिक्षा मागून खावे आणि धर्म-शाळेत येऊन पडावे, असे त्याने सुरू केले. त्याने कित्येक दिवस खूप प्रयत्न केला. सगळे कोयलापाटण धांडोळले. पण कैवाट-राजाचा त्याला कुठेही पत्ता लागेना.

त्या राज्यात हिरालाल नावाचा एक सावकार होता. त्याला मंगलभाटाचे बीन फार आवडले. त्याला वाटले की, हा कोणी-तरी मोठा साधू आहे. तो एक दिवस मंगलभाटाकडे गेला आणि त्याला म्हणाला,

" साधुमहाराज ! तुमचं बीन मला फार आवडतं. तुम्ही एकवार आमच्या घरी या. आमच्या घरच्या मंडळींना तुमचं बीन ऐकवा."

मंगलभाट कबूल झाला. हिरालालच्या मागून त्याच्या घरी गेला. हिरालालने त्याला बसायला आसन दिले. घरातल्या सर्व

मंडळींनी येऊन त्याला नमस्कार केला. हिरालालच्या बायकोने त्याला सुग्रास अन्नाचे जेवण वाढले. मंगलभाट पोटभर जेवला. मग सावकार त्याला म्हणाला,

" जोगीमहाराज ! आता आम्हांला तुमचं बीन ऐकवा. "

त्यावर मंगलभाट बोलला,

" मी मागेन ते द्याल, तर बीन वाजवतो. "

हिरालाल विचारात पडला. ' मागेल ते कसं द्यायचं ? सगळं घरदार मागितलं तर ? ' त्यावर हिरालालची बायको त्याला म्हणाली, " बोलून चालून जोगी ! तो घरदार, धनदौलत कशाला मागेल ? आपल्या दारातल्या वेलावर सुंदर वाटोळे दुधी भोपळे आले आहेत. जोग्याचं मघापासून त्या भोपळ्यांकडे लक्ष आहे. बीन बनवतात ते असल्याच भोपळ्याचं. तेव्हा जोगी ते भोपळेच मागणार. तुम्ही त्याला कबूल करा. "

हिरालालने जोग्याला सांगितले,

" जोगीमहाराज ! तुम्ही बीन वाजवा. मागाल ते देईन. "

जोग्याने बीन वाजवणे सुरू केले. वाजवता वाजवता तो तल्लीन झाला. सावकाराच्या घरातली माणसेही ऐकता ऐकता भान विसरली. सर्वांनाच त्याचे वाजवणे आवडले. प्रहरभर वाजवून तो थांबला. सावकार त्याला म्हणाला,

" आता तुला काय हवं ते सांग. "

त्यावर मंगलभाट म्हणाला,

" मला घर नको, दार नको, धन नको, दौलत नको.

गिरनारचा कैवाटराजा या नगरात येऊन अणतरायाच्या कैदेत पडला आहे. अणतरायाने त्याला कुठं ठेवलं आहे तेवढं मला सांग. बस ! मला दुसरं काहीही नको. ”

ते ऐकून हिरालाल घाबरला. कैवाटराजा कुठे अडकून पडला आहे, हे त्याला माहीत होते. पण ती गोष्ट दुसऱ्या कोणाला सांगण्याचे त्याला धैर्य नव्हते. तो मंगलभाटाला म्हणाला,

“ हे तुझं मागणं अवघड आहे. कैवाटराजा अमुक ठिकाणी आहे असं हातानं सांगितलं, तर अणतराय माझा हात तोडील. पायानं दाखवलं तर पाय तोडील. तोंडानं सांगितलं, तर जीभ छाटील. तेव्हा ही गोष्ट तुला मी कशी सांगू ? ”

त्यावर मंगलभाट म्हणाला,

“ तू मला वचन दिलं आहेस. वचन मोडणार असलास तर खुशाल मोड. तुलाच पाप लागेल. आणि मी गावोगावी सांगत फिरेन की, हिरालाल हा लबाड माणूस आहे. तो दिलेलं वचन मोडतो. ”

हिरालाल मोठ्या संकटात पडला. सांगावे तर संकट, न सांगावे तर पाप. अशा स्थितीत त्याची बायको पुढे आली. ती मंगलभाटाला म्हणाली,

“ तुम्ही उद्या सकाळी मी पाणवठ्यावर जायला लागले की, माझ्या मागून या. वाटेत मी एक दगड उचलून ज्या एका पिंजऱ्यावर मारीन, त्या पिंजऱ्यात कैवाटराजा आहे असं समजा. ”

दुसऱ्या दिवशी मंगलभाट सावकाराच्या बायकोच्या मागोमाग गेला. तिने ज्या पिंजऱ्यावर दगड मारला, तो पिंजरा कैवाटराजाचा आहे, हे त्याला समजले. पण त्या भागात पोलीस पहारा कडक होता. त्यामुळे त्याला कैवाटराजाकडे जाता आले नाही. त्याने तो दिवस कसाबसा घालवला. अर्धी रात्र होईपर्यंतही त्याने काही हालचाल केली नाही. मग तो उठला. लपत छपत राजाच्या पिंजऱ्याकडे गेला. पहारेकरी झोपले होते. त्यामुळे त्याला थेट पिंजऱ्याच्या दारापर्यंत जाता आले. त्याने तिथून राजाला हळूच हाक मारली. राजाला झोप नव्हतीच. त्याने विचारले,

"कोण आहे ?"


"मी मंगलभाट. मुद्दाम तुमच्या शोधासाठी आलो आहे."

आतबाहेर सगळीकडे अंधार होता. त्यामुळे कोणी कोणाला दिसत नव्हते. पण राजाने शब्दावरून मंगलभाटाला ओळखले. तो म्हणाला,

"माझ्या हातापायांत साखळदंड आहेत. गळाही साखळीत अडकवला आहे. मला काहीच हालचाल करता येत नाही. आणि माझ्या अंगात आता ताकदही उरली नाही. असाच आणखी काही दिवस इथं उरलो तर मी मरून जाईन."

मंगलभाटाला त्याचे हे निराशेचे शब्द ऐकून फार दुःख झाले. तो म्हणाला,

" महाराज, असे कष्टी होऊ नका. धीर सोडू नका. मी उद्याच्या उद्या इथून परत जाईन आणि तुम्हांला इथून सोडवण्याची शिकस्त करीन. बरं आहे. जातो मी. "



मंगलभाट कैवाटराजाला भेटतो.

मंगलभाट पिंजऱ्यापासून दूर झाला. रात्रीच्या त्या अंधारातच त्याने कोयलापाटण सोडले. तो रोज दहा कोसांची मजल मारून गिरनारला आला. राजाची राणी त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. मंगलभाट आल्याची वर्दी मिळताच तिने त्याला लगेच बोलावून घेतले.

" काय खबर आहे ? " तिने अधीर होऊन विचारले.

मंगलभाटाने राजाचा सगळा वृत्तान्त तिला सांगितला. तो ऐकून राणीचा धीर खचला. ती हुंदके देऊन रडू लागली. पुढे काय करावे, हे तिला काहीच सुचेना. राजा खरोखर क्रूर

वाघाच्या जबड्यात सापडला होता. तिथून त्याला सोडवून आणणे म्हणजे एक दिव्य होते. तसाच मोठा पराक्रमी पुरुष त्या मोहिमेवर जायला हवा होता. पण राणीला राज्यात तसा धीराचा आणि युक्तीचा पुरुष कोणी दिसेना. ती मंगलभाटाला म्हणाली,

" भाटजी, आता काय करायचं ? "

त्यावर मंगलभाट म्हणाला,

" राणीसाहेब, रागावणार नसाल तर एक गोष्ट सांगतो."

राणी म्हणाली, " नाही रागावणार. बोल."

" काही काळापूर्वी तुमचा भाचा ऊंगा हा तुमच्या राज्यात काही दिवस होता. तुम्ही युवराजांची कड घेऊन त्याचा अपमान केलात. त्याला घालवून दिलंत. ही गोष्ट बरी झाली नाही. तुम्ही त्याला निरोप धाडा. ' झालं गेलं विसरून जा ' असं त्याला कळवा. राजाला सोडवून आणण्याची त्याला गळ घाला. राग आणि अभिमान बाजूला ठेवा. तोच एक पुरुष असा आहे की, जो राजाला सुखरूपपणे सोडवून आणील. शक्तीनं आणि युक्तीनं हे काम साधील."

राणीला मंगलभाटाचे बोलणे पटले. आपली चूक तिला समजून आली. तिने लगेच ऊंगाला पत्र लिहिले. त्यात आपल्या चुकीची कबुली दिली आणि कळवकून लिहिले की, ' काहीही कर पण तुझ्या मामाला सोडवून आण.'

ते पत्र तिने लखोटाबंद करून मंगलभाटाच्याच हाती दिले आणि त्याला सांगितले,

" भाटजी, तुम्हीच हे पत्र घेऊन ऊंगाकडे जा. त्याला सगळा वृत्तान्त सांगा आणि काय घडतं ते मला येऊन कळवा."

ऊंगा हा एक सरदार होता. त्याचेही एक छोटेसे राज्य होते. मंगलभाट तिथून निघाला, तो योग्य वेळी ऊंगाच्या राज्यात पोचला. त्याने ऊंगाला आपण आल्याची वर्दी दिली. ऊंगाने त्याला आपल्या बैठकीत बोलावून घेतले. मंगलभाटाने राणीचे पत्र त्याच्या हाती दिले. ऊंगाने ते फोडून वाचले. वाचता वाचता तो गंभीर झाला. कैवाटराजा हा त्याचा मामा होता. त्याचे मामावर प्रेम होते. अणतराय राजाने त्याची अशी दशा केली हे ऐकून त्याने आपल्या दाताखाली ओठ दाबला. त्याचे डोळे लालबुंद झाले.

पण कैवाटराजाला सोडवणे ही गोष्ट सोपी नव्हती. अणतराय हा बलाढ्य राजा होता. त्याच्या पदरी सैन्यही पुष्कळ होते. त्यामुळे त्याच्यावर सरळ सरळ हल्ला करणे ही गोष्ट ऊंगाला अशक्य होती. तेव्हा कोणत्या तरी युक्तीनेच हे काम साधायला हवे, असे त्याने मनाशी योजले. तो विचार करू लागला. पण निश्चित योजना ठरेना. म्हणून त्याने आपला एक गुप्त हेर कोयलापाटणमध्ये पाठवला. तो त्या राज्याची सगळी परिस्थिती पाहून आला. आल्यावर त्याने ऊंगाला सांगितले की, ' अणत-

रायाच्या राज्यात बाकी सगळे ठीक आहे. पण गवताचं दुर्भिक्ष आहे.

हे ऐकताच ऊंगाला युक्ती सुचली. त्याने शंभर बैलगाड्या जमवल्या. प्रत्येक गाडीवर दहा दहा गवताचे भारे चढवले. त्या प्रत्येक भाऱ्यात एक एक सैनिक लपवला. अशा रीतीने एक हजार निवडक सैनिक गवताच्या भाऱ्यांत लपवून ऊंगाने त्या बैलगाड्या कोयलापाटणच्या रस्त्याने हाकारल्या.

आपण स्वतः भले भक्कम मुंडासे बांधून आणि धोतराचा काचा मारून गवताचा व्यापारी बनला आणि त्या गाड्यांच्या पुढे एका स्वतंत्र गाडीत बसून चालू लागला.

त्या शंभर गाड्या कोयलापाटणच्या रस्त्यातून जेव्हा घुंगूर खळखळनीत घडघडत जाऊ लागल्या, तेव्हा नगरातले लोक धावतच पुढे आले. त्यांनी ऊंगाला विचारले,

" गवत विकायचं का ? "

ऊंगा म्हणाला,

" छट् ! या गवताच्या गाड्या दिल्लीला चालल्या आहेत. बादशहाने आपल्या गुरांसाठी आणि घोड्यांसाठी हे गवत मागवलं आहे."

ते ऐकून लोकांची निराशा झाली. ते उठून अगतराय राजाकडे गेले अन् राजाला म्हणाले,

" महाराज, नगरातून गवताच्या गाड्या चालल्या आहेत. पण तो व्यापारी गवत विकायला तयार नाही. तेव्हा तुम्ही त्या

गाड्या अडवा. व्यापाऱ्याला इथं गवत विकायला लावा. आमची गुरंढोरं गवतावाचून रोडावली आहेत. आणखी काही दिवस गवत मिळालं नाही, तर राज्यातली सगळी गुरं मरून खलास होतील. मग कुठलं दूध आणि कुठलं दही ?"

राजाला प्रजेचे बोलणे पटले. त्याच्याही गोशाळेतल्या गाई आणि पागेतले घोडे गवताच्या अभावी हाडाचे सापळे बनले होते. अणतरायाने आपल्या कारकुनाला पाठवून शंभर गाड्यांच्या गवताचा सौदा ठरवला.

राजाने शिपायांना सांगितले की, सगळे गवताचे भारे तपासून बघा. काही दगाफटका नाही याची खात्री करून घ्या.

लगेच शिपाई पुढे झाले. त्यांनी आपल्या हातातले भाले त्या गवताच्या भाऱ्यात खुपसले. पण प्रत्येक भाऱ्यातला सैनिक सावध होता. भाला खुपसला जात आहे असे पाहून त्यांनी आपले अंग चोरले. एका दोघांच्या अंगाला भाल्याचे टोक लागले. थोडेसे रक्तही भाल्याला लागले. पण भाला बाहेर ओढायच्या आतच त्यांनी ते पाते पुसून स्वच्छ केले. त्यामुळे शिपायांना त्या सैनिकांचा सुगावा लागला नाही. वीस-पंचवीस गाड्या अशा रीतीने तपासून पाहिल्यावर शिपायांची खात्री पटली की, या गवताच्या भाऱ्यांत गवताशिवाय दुसरे काही नाही. मग त्यांनी ऊंगाला सांगितले,


"सोड तुझ्या गाड्या."

त्यावर ऊंगा म्हणाला,

" या मोकळ्या मैदानात गाड्या सोडल्या तर माझे बैल उधळतील. मग त्यांना शोधून कोण आणणार? तेव्हा माझ्या गाड्या थेट राजवाड्याच्या तटाच्या आत जाऊ देत. तिथल्या प्रांगणात मी गाड्या सोडीन, गवताच्या गंज्या रचून देईन आणि राजाकडून गवताची रक्कम घेऊन निघून जाईन."

शिपायांना ते पटले. त्यांनी सगळ्या गाड्या तटाच्या आत घेतल्या. एका रांगेने गाड्यांची कतार उभी केली. मग तो मोठ्याने म्हणाला,

" गवताच्या भाऱ्यांनो, सुटा रे! सुटा."



गवताच्या भाऱ्यांतून सैनिक बाहेर पडले.

त्यासरशी प्रत्येक भाऱ्यातून एक एक सैनिक पटापटा गाडी-खाली उड्या टाकू लागला. प्रत्येकाच्या हातात ढाल-तलवार होती. हां हां म्हणता एक हजार कडवे सैनिक त्या प्रांगणात गोळा झाले. ऊंगानेही एका भाऱ्यात लपवून ठेवलेली आपली ढाल-तलवार काढून घेतली. सर्वांनी एकच हलकल्लोळ केला.

सगळे जण मिळेल त्या दरवाज्याने राजवाड्यात घुसले. जो आडवा येईल त्याला कापीत सुटले. राजवाड्यात सगळीकडे हाहाकार माजला. अणतराय राजाच्या कानावर ही वर्दी जाते न जाते तोच ऊंगाच्या सैनिकांनी त्याला घेरले. एकाने त्याच्या हातातली तलवार उडवली. दुसऱ्याने त्याची ढाल खाली पाडली, अणतराय निःशस्त्र झाला. ऊंगा आपल्या सैनिकांना म्हणाला,

" कैवाटराजाला निष्कारण बंदीत टाकणारा हाच तो दुष्ट अणतराय! पकडा याला."

लगेच सैनिकांनी अणतरायाला पकडले आणि त्याच्या दंडांना काढण्या बांधल्या. ज्याने कैवाटराजाला तीर्थयात्रेला नेतो असे सांगून फसवून आणले, तो सुजान राजाच्या जवळच होता. राजा गिरफदार झालेला पाहून तो लपून बसला. पण ऊंगाने त्याला शोधून काढले आणि त्याच्या उघड्या पाठीवर चाबकाचे चार फटकार ओढले. सुजान घळघळा रडू लागला, गयावया करू लागला. पण कोणाला त्याची दया आली नाही. ऊंगाच्या सैनिकांनी त्याच्याही दंडांना काढण्या बांधल्या. मग ऊंगा अणतरायाला म्हणाला,

" कैवाटराजाला कुठे कैद करून ठेवलं आहेस ते दाखव."

अणतराय म्हणाला, ' दाखवतो, पण सुजानला मारलंत तसं मला मारू नका.' ऊंगा म्हणाला, ' नाही मारणार.' मग अणतराय पुढे आणि ऊंगा मागे अशी ती मिरवणूक कैवाट राजाच्या पिंजऱ्याकडे पोचली.

ऊंगाने पिंजऱ्याच्या गजांतून कैवाटराजाला पाहिले. तो ऊंगाचा मामा होता. आपल्या मामावर त्याचे खूप प्रेम होते. एखाद्या जनावराला पिंजऱ्यात कोंडून ठेवावे तशी दशा अणतरायाने आपल्या मामाची केली, याचे त्याला दुःख झाले. त्याने तो पिंजरा तोडला आणि कैवाटराजाला मोकळे केले. आपला भाचा आपल्याला सोडवायला आला आणि त्याने मोठा पराक्रम केला, हे पाहून कैवाटराजाचे ऊर भरून आले. त्याने 'शाबास बेटा' म्हणून ऊंगाची पाठ थोपटली. ऊंगाने आपल्या मामाच्या गळ्याला मिठी घातली.

मग कैवाटराजा आणि ऊंगा दोघेही गिरनारला यायला निघाले. येताना त्यांनी अणतराय व सुजान या दोघांनाही कैद करून गिरनारला आणले.


राजा सुखरूप परत आलेला पाहून राणीचे डोळे आनंदाने भरून आले. तिने राजाला पंचारती ओवाळली. मग मोठा दरबार भरला. कैवाटराजा सिंहासनावर बसला. ऊंगा त्याच्या उजव्या हाताच्या आसनावर बसला. अणतराय आणि सुजान या दोघांना शिपायांनी खेचून आणून दरबारात राजापुढे उभे केले. प्रधानाने राजाला विचारले,

"महाराज, या दोन्ही आरोपींचा अपराध मोठा आहे. त्यांनी निष्कारण आपल्याला आणि आपल्या राज्याला भलताच त्रास दिला आहे. यांना काय शिक्षा द्यायची ते सांगा."

त्यावर राजा गंभीरपणे म्हणाला,

" आता पेरणीचे दिवस जवळ आले आहेत. तुम्ही राजाचं शेत या दोघांच्याकडून नांगरून घ्या. बैलाच्याऐवजी यांना नांगराला जुंपा अन् पेरणी झाली की, यांना दहा दहा फटके मारून राज्यातून घालवून द्या."

' आज्ञा महाराज ' प्रधानाने म्हटले, आणि मग राजाच्या नोकरांनी त्या दोघांना दिलेली शिक्षा करून अंमलात आणली. नांगर ओढता ओढता अणतराय आणि सुजान या दोघांचा जीव रडकुंडीला आला आणि वर फटके खावे लागले ते वेगळेच. एवढे होते न होते तोच मंगलभाट कैवाटराजापुढे येऊन उभा राहिला. राजाची सुटका झाल्याबद्दल मंगलभाटाने त्याचे अभिनंदन केले. राजाने मंगलभाटाला भरपूर दक्षिणा दिली आणि खूष करून त्याला घरी पाठवले.



[illegible] वाङ्मय विभाग
क्र. २८२८ दिनांक
विषय बा. वा.

# दादा, मला सोबत कर

एक छोटेसे गाव होते. गावाच्या बाहेर एक वडाचे झाड होते. ते खूप पसरले होते. त्याच्या पारंब्या जमिनीवर लोळत होत्या. त्याच्याजवळूनच एक ओढा वाहात होता. त्या ओढ्यातून बारमहा पाणी झुळझुळे. ते वडाचे झाड नि तो ओढा यांच्यामध्ये मोडकळीस आलेले एक लहानसे घर होते.

त्या घरात फक्त दोनच माणसे राहात होती. एक रामनाथ व दुसरी त्याची आई. रामनाथाचे वडील लहानपणीच वारले होते आणि त्याची आई अनाथ झाली होती. ती गावात कोणाच्या तरी घरी किंवा कोणाच्या तरी शेतात मोलमजुरी करून कसेबसे आपले आणि रामनाथाचे पोट भरी. रामनाथाला दूध, दही देता येत नाही, पोटभर वाढता येत नाही, त्याला चांगले कपडे शिवता येत नाहीत, म्हणून तिला फार दुःख होई.

रामनाथाची आई कृष्णभक्त होती. गोकुळात यशोदेची रवी धरून ठेवणारा, गवळ्यांच्या घरांतली शिंकी तोडणारा आणि गोपालांसंगे दह्यादुधाचा रबडा करणारा कृष्ण तिला फार आवडायचा. ती कृष्णाच्या गोष्टी तासन् तास ऐकत बसायची आणि ऐकल्यानंतर मनातल्या मनात त्याच गोष्टी घोळवीत राहायची. तिला वाटायचे की, कृष्ण यशोदेचा मुलगा नसून आपलाच मुलगा आहे. ओढ्यापलीकडील जंगल म्हणजे वृंदावन. त्या वृंदावनात तो गाई चारतो आहे. मुरली वाजवितो आहे. आज ना उद्या कधी तरी तो गाई-वासरं घेऊन मुरली वाजवीत तिन्हीसांजा आपल्या दारी येऊन उभा राहील. मग आपण त्याची दृष्ट काढू. दारात आलेल्या गाईची धार काढू आणि ते धारोष्ण दूध वाडग्यातून त्याला नि आपल्या रामनाथाला प्यायला देऊ. असंच काही तरी तिला वाटत राहायचं. ती नेहमी स्वतःशीच म्हणायची, ' आपल्याला दोन मुलगे आहेत. कृष्ण थोरला नि रामनाथ धाकटा. '

अशा गोड गोड कल्पनांनी रामनाथाची आई आपल्या दरिद्री संसारात सुख मानून घेई. तिला वाटे आज ना उद्या थोरला भाऊ धाकट्या भावाला मदत करील. तो रामनाथाला खूप खूप द्रव्य देईल. जसं सुदाम्याला दिलं तसं.

होता होता रामनाथ आठ वर्षांचा झाला. रामनाथाच्या आईने कशीबशी त्याची मुंज उरकून घेतली. पुढे आला प्रश्न त्याच्या शिक्षणाचा. रामनाथाने खूप खूप शिकावे, मोठा विद्वान

व्हावे असं तिला वाटे. पण तिच्या गावात कोणी शास्त्री-पंडित नव्हता. कोणी पंतोजीही नव्हता. चौकशी करता करता तिला कळले की, जंगलापलीकडे एक गाव आहे आणि त्या गावात एक पाठशाळाही आहे. तिथले गुरुजीही मोठे विद्वान आहेत. आजूबाजूची बरीच मुले त्यांच्याकडे शिकायला येतात आणि ते सगळ्यांना मन लावून शिकवितात. ते ऐकून रामनाथाच्या आईला वाटले की, आपल्या मुलाला त्या गुरुजींकडे पाठवावे.

पण ते गाव तिथून कोसभर लांब होते आणि सगळा रस्ता जंगलाचा होता. तिने रामनाथाला विचारले,

"रामनाथ, माझ्या राजा! तू ह्या जंगलापलीकडच्या शाळेत जाशील का रे ?"

रामनाथ म्हणाला, "मी एकटा कसा जाऊ? मला जंगलाची भीती वाटते. तू पोचवायला आणि आणायला येशील, तर मी जाईन."

"मी तुला पोचवायला अन् आणायला गेले तर घरचं काम कोण करील? तुला स्वयंपाक करून जेवायला कोण वाढील?"

"मी एकटा नाही जाणार जा."

"हे बघ, तू असं कर. तुला एक गंमत सांगते. त्या जंगलात किनई, तुझा दादा राहतो. तुझ्यापेक्षा थोडासा मोठा आहे तो. आहे काळासावळाच, पण दिसतो मोठा सुंदर."

रामनाथाने आश्चर्यचकित होऊन विचारले,

"तो रानात काय करतो?"

" त्याच्याजवळ खूप गाई आहेत. तो रानात त्यांना चारतो. आणि मनाची करमणूक करायची म्हणून मुरली वाजवितो. त्याला छान छान मुरली वाजवता येते."

" आई, मग तो आपल्या घरी का येत नाही ? "

" नाही येत. त्याला रानातच राहायला आवडतं. रानातून जाताना तुला भीती वाटली की, तू त्याला हाक मार, म्हणजे तो तुझ्या सोबतीला येईल. तुला रानाच्या पलीकडे नेईल."

" पण मी त्याला ओळखायचं कसं ? "

"त्याच्या डोक्यावर मुकुट असतो अन् त्या मुकुटात मोराचं पीस असतं. त्या मोरपिसावरून तू त्याला ओळख. "

रामनाथाने बरे म्हटले. ' तर मग मी आजच शाळेला जातो.' असे म्हणून रामनाथ जायला निघाला. आईने त्याला जवळ घेऊन त्याचे तोंड कुरवाळले आणि पाठ थोपटली. ती डोळ्यांत पाणी आणून भरल्या गळ्याने त्याला म्हणाली,

" जा बरं बाळ ! खूप विद्या शीक. खूप मोठा हो ! दादा तुझं खूप कौतुक करील ! तुला काही कमी पडू देणार नाही."

रामनाथ ओटा उतरून पलीकडे जाईपर्यंत ती त्याच्याकडे पाहात राहिली. तो दिसेनासा होताच तिच्या गालांवरून दोन अश्रुबिंदू खाली ओघळले. रामनाथ हळूहळू जंगलात शिरला. जरा कुठे खुट्ट वाजलं की तो दचके. जरा कुठे सरसर आवाज झाला की त्याची छाती धडधडू लागे. पुढे जाता जाता जंगल खूप दाट झाले. पायाखालची पायवाट अगदीच पुसट झाली.

नेमके कुठून पलीकडे जायचे, तेही त्याला कळेनासे झाले. वर बघावे तो उंच घनदाट वृक्ष ! सभोवती बघावे, तर किर्र रान ! मध्येच पाखरांची फडफड.

कुठून पुढे जायचे हे पाहता पाहता दूरच्या झुडुपात त्याला एक प्राणी दिसला. रामनाथला वाटले, बिबळ्या वाघ म्हणतात तो हाच असला पाहिजे आणि मग मात्र त्याची भयाने गाळण उडाली. त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. आता त्याला पुढेही जाता येईना आणि मागेही फिरता येईना. मग मात्र त्याने गळ्यात प्राण आणून हाक मारली.

" दादा ! मी एकटा पडलोय ! मला फार भीती वाटते. तू ताबडतोब माझ्या सोबतीला ये. दादा, धावत ये ! "

आणि दुसऱ्याच क्षणी त्याला मुरलीचे गोड स्वर ऐकायला आले. सारे रान जणू त्या नादाने भरून गेले. झाडेमाडे स्तब्ध झाली. वारा थांबला आणि वेलींचीही हालचाल थांबली. पाठोपाठ एक दहा वर्षांचा मुलगा रामनाथाच्या पुढे येऊन उभा राहिला. तो काळा–सावळा होता. पीतांबर नेसला होता. त्याने फूल-पत्रींची माळ गळ्यात घातली होती. त्याच्या डोक्यावर मुकुट होता व त्यात मोराचे पीस होते. तो रामनाथाकडे हसत हसत पाहात होता. मोरपिसाच्या खुणेवरून रामनाथाने त्याला ओळखले. तो म्हणाला,

" तूच माझा दादा ना ? "

"होय, मीच तुझा दादा." असे म्हणून कृष्णाने रामनाथाच्या खांद्यावर उजवा हात ठेवला.



'तूच माझा दादा ना?' रामनाथने विचारले.

"चल मग मला जंगलापलीकडे नेऊन सोड. मला तिथल्या शाळेत जायचं आहे. संध्याकाळी शाळा सुटली की, परत येताना अशीच मी तुला हाक मारीन. मग तू मला माझ्या घराजवळच्या ओढ्यापर्यंत पोचवायला ये."

कृष्णाने 'ठीक आहे' म्हटले आणि रामनाथला नेऊन जंगलापलीकडे सोडले. जाताना आणि येताना त्या दोघांनीही खूप गप्पागोष्टी केल्या. रामनाथाला त्याचा दादा खूप आवडला.

मग एक दिवस त्याने धीर करून कृष्णाला म्हटले, 'आज चल ना रे आपल्या घराकडे! माझ्या आईच्या हातची भाकरी

खा. तुला खूप खूप आवडेल ती. तिच्याशी चार गोष्टी बोल. तिला बरं वाटेल. दादा, माझी आई तुझ्यावर किती प्रेम करते ते ठाऊक नाही तुला. ती मला बोलते पण तुला नेहमीच चांगला म्हणते. तू एकदा तरी तिला भेटायलाच हवंस."

"आज नको. मी कधी तरी तिला भेटेन."

"आज का नको?"

"अरे वेड्या, माझ्या गाई रानात आहेत ना, त्या भलतीकडे जातील आणि वाघाच्या तावडीत सापडतील. मी असलो म्हणजे वाघ दूर पळतात."

रामनाथाला ते खरे वाटले. मग त्याने आपल्या दादाला घरी यायचा कधी आग्रह केला नाही. अशी काही वर्षे निघून गेली. रामनाथ आता पंधरा वर्षांचा झाला. तो वेद शिकला. शास्त्र शिकला आणि खूप शहाणा झाला. त्याची हुषारी पाहून त्याच्या आईला आकाश ठेंगणे झाले. ती त्याला नेहमी म्हणे, 'दादा तुझा पाठीराखा होता म्हणून तुझी विद्या झाली. तू तुझ्या दादाला कधीही विसरू नको.'

रामनाथ म्हणे, "आई, मी दादाला कधीही विसरणार नाही. दादाशिवाय मला आता चैनच पडायचं नाही."

त्यानंतर थोड्या दिवसांनी त्याच्या गुरुजींच्या घरी त्यांच्या मुलीचे लग्न निघाले. मुहूर्त ठरला. मांडव घातला गेला. नातेवाईक जमू लागले. रामनाथाच्या बरोबरीचे विद्यार्थी नवऱ्या मुलीला अहेर काय द्यायचा याचा विचार करू लागले. त्यांनी

रामनाथाला विचारले, "काय रे रामनाथ, तू काय देणार?" पण रामनाथाला काही सांगता आले नाही. घरी येऊन त्याने आईला विचारले,

"आई, गुरुजींच्या मुलीला अहेर काय द्यायचा ग?" त्यावर आई म्हणाली, "आपण पडलो गरीब; आपल्या घरी काय आहे देण्यासारखं?"

"आई, पण तसं नाही चालायचं. काही तरी द्यायलाच हवं. नाही तर माझ्याबरोबरीचे सगळे विद्यार्थी माझी फजिती करतील."

"मग तू तुझ्या दादालाच विचार. तो देईल काही तरी."

रामनाथाने बरे म्हटले. लग्नाच्या दिवशी सकाळी तो गुरूच्या घरी जायला निघाला. नित्याप्रमाणे त्याने कृष्णाला हाक मारली आणि कृष्णही ताबडतोब त्याच्याजवळ आला. कृष्णाने त्याला विचारले,

"काय रे रामनाथ, आज तुझं तोंड मलूल का दिसतं?"

"दादा, मी मोठ्या संकटात सापडलोय! गुरुजींच्या मुलीचं लग्न आहे. पण तिला अहेर द्यायला माझ्या आईजवळ काही नाही. मी रिकाम्या हातानं गेलो तर सगळे हसतील मला. तू देशील काही तरी?"

"हो, हो! अवश्य देईन. थांब हं इथे."

असे म्हणून कृष्ण एकदम अदृश्य झाला. थोड्याच वेळात तो पुन्हा रामनाथाकडे आला. नारळाचा एक सुंदर तुकतुकीत

आणि नक्षीदार बेला रामनाथाच्या हाती देऊन कृष्णाने त्याला म्हटले,

" ही घे अहेराची वस्तू. "

तो बेला जड आणि बंद होता. रामनाथाने त्याला विचारले,

" दादा, यात काय आहे रे ? "

" अरे मी बोलून चालून गुराखी. माझ्याजवळ दुधाशिवाय दुसरं काय असणार ? मी या बेल्यात माझ्या कपिला गाईचं ताजं दूध भरून दिलं आहे. जा घेऊन. "

रामनाथ तो बेला आपल्या उपरण्याखाली लपवून लग्नघरी गेला. ठरलेल्या मुहूर्तावर लग्न लागले. नवरा-नवरी दोघेही बोहल्यावर बसली. मग जमलेल्या इष्टमित्रांनी त्यांना अहेर केले. रामनाथाच्या बरोबरीचा एक विद्यार्थी राजपुत्र होता. त्याने आपल्या गुरूच्या मुलीला नवरत्नांचा हार दिला. एका व्यापाऱ्याच्या मुलाने तिला मोत्याचा कंठा दिला. तिसऱ्याने तिला रेशमी साडी दिली. चवथ्याने कर्णफुले दिली. असे अनेकांनी अनेक अहेर केले. मग त्याच्या सोबत्यांपैकी एकजण म्हणाला,

" रामनाथ, तुझा अहेर दे ना. " त्यावर रामनाथ लाजत लाजत उठला. त्याने उपरण्याखालून तो नारळाचा बेला बाहेर काढला. तो पाहून सगळे विद्यार्थी हसले.

" हे रे काय ? तू गुरुजींच्या मुलीला या करवंटीचा अहेर करणार ? शहाणाच आहेस ! "

रामनाथ त्यामुळे अधिकच लाजला. पण लगेच गुरुजींनी त्याला पुढे बोलावून जवळ घेतले आणि विचारले,

" बेला मोठा छान आहे हं ! वरची रंगीत नक्षी तरी किती सुबक आहे ! काय आणलं आहेस या बेल्यात ? "

" गुरुजी, दूध आहे या बेल्यात. "



बेल्यातील दूध संपेना.

"असं का ! वाः, फार छान ! खिरीत घालायला उपयोगी पडेल."

असे म्हणून गुरुजींनी ते दूध ओतून घेण्यासाठी एका विद्यार्थ्याला भांडे आणायला सांगितले. तो विद्यार्थी होता मोठा खवचट ! त्याला भरल्या सभेत रामनाथची फजिती करायची होती. म्हणून त्याने लहान भांडे आणण्याऐवजी एक घंगाळ पुढे आणून ठेवले. तो रामनाथाला म्हणाला, " ओत याच्यात."

रामनाथने त्या बेल्याचे झाकण उघडले आणि बेला त्या घंगाळात पालथा केला. त्यातून दुधाची करंगळीएवढी धार घंगाळात सांडू लागली. घंगाळ पाव भरले, अर्धे भरले, सगळे भरले, तरी धार काही खळेना. घंगाळ भरून दुधाचे ओहोळ जमिनीवर वाहू लागले तरीही बेल्यातले दूध संपेना आणि धार काही खळेना ! लोकांनी दुसरे भांडे आणले ते भरले. तिसरे आणले तेही भरले; तरी बेला काही रिकामा होईना आणि धार काही खळेना. जमलेल्या सर्वांना या गोष्टीचे विलक्षण आश्चर्य वाटले. गुरुजींना वाटले की, हा काही तरी दैवी चमत्कार आहे. त्यांनी रामनाथला विचारले,

" बेटा, हा बेला कुठून आणलास तू ? " रामनाथाची छाती आता रुंद झाली होती. त्याची लाज गेली होती. तो म्हणाला,

" हा बेला माझ्या दादानं मला दिला."

" कुठं आहे तुझा हा दादा ? "

" तो या समोरच्या जंगलात राहतो. त्याच्याजवळ खूप गाई आहेत. माझा दादा इतका सुंदर आहे की त्याच्याकडे बघतच राहावं. मुरली तर इतकी छान वाजवितो—"

रामनाथाचे हे बोलणे ऐकल्यावर त्याच्या गुरुजींना मोठे नवल वाटले. ते मनात म्हणाले, ' रामनाथाचा दादा म्हणजे साक्षात् श्रीकृष्णच असला पाहिजे. हा पोरगा मोठा भाग्यवान खरा ! मी इतकी वर्षे रोज जप–तप करतो, पण मला एकदाही श्रीकृष्णाचे दर्शन झाले नाही. अन् या मुलाला मात्र तो रोज

दर्शन देतो, त्याला सोबत करतो, मुरली ऐकवितो. नशीबवान आहे बेटा !'

गुरुजी त्याला म्हणाले, "रामनाथ, तुझा दादा तू मला दाखवशील ?"

"हो हो, अवश्य दाखवीन. चला माझ्याबरोबर."

दुसऱ्याच क्षणी रामनाथ आपल्या गुरुजींना घेऊन जंगलाकडे निघाला. गुरुजींच्या पाठोपाठ त्यांचे पाहुणेही निघाले. त्यांच्या मागोमाग नवरा-नवरीही निघाली. हा सगळा माणसांचा घोळका जंगलाचा रस्ता तुडवू लागला.

एका ठराविक जागी आल्यावर रामनाथ थांबला. तो थांबला तशी सगळेच लोक थांबले. सगळ्यांनाच श्रीकृष्णाच्या दर्शनाची उत्कंठा लागली होती. सगळ्यांनाच रामनाथाचे कौतुक वाटत होते. रामनाथ त्या सर्वांना म्हणाला, 'आता बोलू नका हं ! मी दादाला हाक मारतो.' असं म्हणून त्याने मोठ्यांदा हाक दिली,

"दादाऽऽऽ! लवकर ये ! ही बघ तुला बघायला खूप माणसं जमली आहेत."

पण श्रीकृष्णानं त्याच्या हाकेला ओ दिली नाही. तो त्याच्याजवळही आला नाही. रामनाथाला जरा अचंबा वाटला. त्यानं पुन्हा हाक मारली,

"दादा रेऽऽऽ! लवकर ये ! "

पण दादा आला नाही. कुठून तरी दुरून त्याचा आवाज तेवढा ऐकू आला.

"रामनाथ, मी येणार नाही. मी असा आलतू फालतू माणसांना भेटत नसतो. जे दीन-दुबळे असतात, एकटे पडलेले असतात आणि जे माझी भक्ती करतात, त्यांनाच मी दर्शन देतो. आजपासून मी तुलाही कधी भेटणार नाही. तुझा-माझा संबंध संपला! आता तू मोठा झाला आहेस. यापुढे तुला जंगलातून एकटं जायला भीती वाटणार नाही. इथून पुढे तू मला हाक मारू नको!"

बिचारा रामनाथ! श्रीकृष्णाचं हे बोलणं ऐकून तो दुःखी झाला. निराश झाला. त्याच्याबरोबर आलेली माणसं म्हणाली की मुलगा खोटारडा आहे. ती त्याला सोडून आपल्या घरी निघून गेली. रामनाथाला एकदम हुंदका फुटला. तो रडत रडतच घरी आला. आईनं त्याला पोटाशी धरलं, तशी त्याला अधिकच रडू कोसळलं. आईनं त्याचे डोळे पुसून त्याला विचारलं, "बेटा, काय झालं?"

रामनाथानं घडलेली सगळी हकीगत आईला सांगितली. शेवटी अत्यंत काकुळती येऊन आणि आईच्या गळा मिठी घालून तो म्हणाला,

"आई, आता दादा मला कधीच भेटणार नाही का ग? मी काय करू?"

त्यावर आई त्याला म्हणाली, "रडू नको बाळा, रडू नको! दादा तुझा देव आहे. तू त्याची भक्ती कर. त्याची सदैव आठवण ठेव. आज ना उद्या कधी तरी तो तुला खात्रीनं भेटेल!"

# भोंदू वैरागी

एक होता सावकार. तो मोठा धार्मिक होता. तो नित्य खूप दानधर्म करी. अतिथ-अभ्यागतांना सुग्रास जेवण घाली. त्यामुळे त्याची कीर्ती सगळीकडे पसरली होती.

साधू–वैरागी गावात आले की, त्याच्या दारात येऊन बसत. सावकार मग भुकेला असेल त्याला जेवायला वाढी. उघडा असेल त्याला कपडे देई. त्यावर दक्षिणा देई आणि अशी संभावना करून मग त्यांची रवानगी करी.

एके दिवशी एक वैरागी सावकाराची कीर्ती ऐकून त्याच्या घरी आला. तो लुच्चा होता; पण मोठा बोलका होता. त्याने सावकाराला देवाच्या आणि धर्माच्या खूप गोष्टी सांगितल्या. त्याचे बोलणे मोठे रसाळ होते. ते ऐकून सावकाराला आनंद झाला. त्याने त्या वैराग्याला काही दिवस आपल्या घरी राहाण्याचा आग्रह केला.

बैराग्याला तेच हवे होते. तो खुषीने सावकाराच्या घरी राहिला. खायला मिठाई, प्यायला केशरी दूध आणि जेवायला सुग्रास अन्न अशी सावकाराने त्याची उत्तम बडदास्त ठेवली. सावकाराचे नोकर–चाकर दिवसभर त्याच्या तैनातीत राबू लागले.

सावकाराला एक मुलगी होती. तिचे नाव होते रत्नावती. ती फार देखणी होती. तिला नुकतेच सोळावे वर्ष लागले होते. ती बोलण्याचालण्यात मोठी चतुर होती. बैरागीबुवाचे सगळे व्यवस्थित होते की नाही, हे पाहण्याची कामगिरी सावकाराने तिच्यावर सोपविली होती.

रत्नावती त्यामुळे वारंवार बैराग्याकडे जाई आणि त्याची चौकशी करी. बैरागी तिला आपल्याजवळ बसवून घेई आणि तिला मजेदार गोष्टी सांगे. करता करता रत्नावती त्या बैराग्याला खूप आवडू लागली. बैरागी पक्का भोंदू होता. त्याच्या मनात एके दिवशी विचार आला की, कसेही करून या मुलीला पळवून न्यावे. त्या कामी कोणती युक्ती करावी हे तो सारखे मनात चिंतीत राहिला आणि एक दिवस त्याला युक्ती सुचली.

त्या दिवशी दुपारी सावकार बैराग्याचे प्रवचन ऐकायला गेला असता बैरागी त्याला गंभीरपणे म्हणाला,

"शेटजी, मला भूत, भविष्य, वर्तमान समजतं. तुमच्यावर लवकरच एक फार मोठं अरिष्ट येणार आहे. तुमची संपत्ती, तुमचं घरदार, तुमच्या घरातली माणसं, हे सर्व एकाएकी नष्ट होणार आहे आणि याला कारण तुमची मुलगी रत्नावती."

सावकाराने चपापून म्हटले, " रत्नावती ? "

" होय, रत्नावती. ती दिसायला सुंदर असली तरी तिचे ग्रह वाईट आहेत. ती तुमच्या कुळाचा नाश करणारी अवलक्षणी मुलगी आहे. पुराणकाली धृतराष्ट्राच्या पोटी एक दुर्योधन जन्माला आला आणि त्याने सगळ्या कुळाचा संहार केला. तसं ही मुलगी तुमच्या कुळाचं करणार आहे."



वैरागी भविष्य सांगू लागला.

शेटजी घाबरला. एकदम काळा ठिक्कर पडला. क्षणभर त्याला काही बोलताच येईना. थोड्या वेळाने त्याने भीत भीत विचारले,

" साधुमहाराज ! हे अरिष्ट कशानं दूर होईल ? मी कसला जप करू ? कोणती शांती करू ? कशाचं दान करू ? "

" शांतीनं आणि दानानं हे अरिष्ट टळणार नाही. तू या

मुलीचा तावडतोब त्याग कर. तरच तुझी आणि तुझ्या कुटुंबाची धडगत आहे. मी तुला उपाय सांगतो. एक लाकडी पेटी तयार कर. त्या पेटीत रत्नावलीला बसव. पेटीचं झाकण लावून तिला कुलूप घाल. आणि ती पेटी नदीत नेऊन सोड. ती वाहात वाहात जाईल. त्या पेटीत तुझी मुलगी मरणार नाही. पेटी कुठे तरी किनाऱ्याला लागेल. कोणाला तरी ती सापडेल. तो ती पेटी फोडील. तिच्यातून रत्नावतीला बाहेर काढील. आणि तिचा प्रतिपाळ करील. ती ज्याच्या घरी जाईल त्याचं भलं होईल.''

वैराग्याने सावकारावर आपला पगडा बसवला होता. सावकाराला तो बैरागी देवाहूनही मोठा वाटे. त्यामुळे नाइलाजाने त्याने बैराग्याचे म्हणणे मान्य केले. आपल्या सोन्यासारख्या मुलीचा त्याग करताना त्याला दुःख झाले खरे, पण आपल्या कुळाचे कल्याण व्हावे, कुळावर संकट येऊ नये, म्हणून त्याने ते दुःख गिळून टाकले आणि मग दुसऱ्याच दिवशी त्याने ती गोष्ट केली. रत्नावती रडली, कळवळली; पण त्याने तिच्यावर दया दाखवली नाही. थोड्याच वेळात एक मोठी पेटी नदीच्या प्रवाहातून वाहात वाहात खाली जाऊ लागली.

बैराग्याच्या मनासारखे झाले. त्याने लगेच सावकाराच्या घरातून गाशा गुंडाळला. सावकार आग्रह करीत असूनही तो तिथे राहिला नाही. कारण त्या बैराग्याला पुढे जाऊन ती पेटी पकडायची होती.

ज्या नदीतून पेटी वाहात जात होती, त्याच नदीच्या काठी

त्या बैराग्याची मठी होती. त्या मठीत त्याचे बरेच चेलेही होते. ते रोज भिक्षा मागून खात आणि रिकाम्या वेळी धुमी पेटवून चिलीम ओढीत बसत. बैरागी धावत धावत तिथे आला. त्याने आपल्या चेल्यांना सांगितले.

" बरं का रे चेल्यांनो ! दिवस रात्र या नदीकडे लक्ष ठेवा. रात्रीसुद्धा जागता पहारा ठेवा. या नदीतून एक मोठी पेटी वाहात वाहात येईल. ती दिसली की, नदीच्या पात्रात उड्या टाका. पोहत पोहत पुढे जाऊन ती पेटी पकडा. तिला आपल्या मठीत घेऊन या. या कामी चुकलात, बेसावध राहिलात, तर याद राखा. तुमची सगळ्यांची टाळकीच फोडीन."

त्याप्रमाणे बैराग्याचे चेले दिवसरात्र नदीवर पहारा करू लागले. दोघे दोघे नदीच्या काठावर बसत आणि बाकीचे भिक्षा मागायला गावात जात. रात्रीसुद्धा दोघे दोघे जागत आणि बाकीचे झोपत.

पण गंमत झाली ती निराळीच. रत्नावतीची पेटी वाहात वाहात निघाली ती मधल्या एका राज्यात नदीच्या तीराला लागली. राज्यातला धोबी नदीवर कपडे धुवायला आला होता त्याला ती पेटी दिसली. एवढी मोठी पेटी कसली वाहात जाते, याचे धोब्याला कुतूहल वाटले. त्याने नदीत उतरून ती पेटी पकडली आणि अलगत तीरावर आणली. पाहतो तो पेटीला भरभक्कम कुलूप !

धोब्याने जवळचा एक दगड उचलून त्या कुलपावर घातला

त्यासरशी कुलूप निखळले. धोब्याने हळूच झाकण उघडले. बघतो तो पेटीत एक मुलगी. सोळा वर्षांची आणि सुंदर. पेटीत पुरेशी हवा न मिळाल्यामुळे रत्नावतीला मूर्च्छा आली होती. थोड्याच वेळात ती धोब्याच्या हाताला लागली म्हणून जगली. नाही तर मरूनच जायची. धोब्याने प्रथम तिला बाहेर काढले. मग तिच्या डोक्यावर पाणी थोपटले. तिच्या तोंडावरही पाण्याचा हापका



धोब्याने रत्नावतीला बाहेर काढले.

मारला. रत्नावती तेवढ्याने सावध झाली. धोब्याने तिला थोडे पाणी प्यायला दिले. ते प्याल्यावर ती बोलू लागली. मग धोब्याने तिला तिचे नावगाव विचारले. तिने धोब्याला सगळी हकीगत सांगितली. ती म्हणाली,

" धोबीदादा, तुझे मोठे उपकार आहेत. तू मला बाहेर काढलीस म्हणून मी जगले. हे सगळं कारस्थान त्या बैराग्याचं. त्यानं माझ्या

बापाला भलभलत्या गोष्टी सांगून मला नदीत सोडायला लावलं.''

धोब्याला वाटले की, त्या बैराग्याचा हेतू काही तरी वाईट असावा. तो कुठे तरी नदीच्या किनाऱ्यावरच राहात असेल आणि या मुलीला पळवून नेण्याचा त्याचा विचार असेल.

धोब्याच्या पुढे प्रश्न उभा राहिला. तो विचार करू लागला, आता या मुलीचे करायचे काय? मोठ्या घराण्यातली ही श्रीमंताची मुलगी. त्यातून तरणीताठी आणि सुंदर. हिला आपल्या घरी ठेवून घेणे काही योग्य होणार नाही.

म्हणून मग तो रत्नावतीला घेऊन आपल्या राजाकडे गेला. राजाला त्याने सगळी हकीगत सांगितली. राजा म्हणाला की "या मुलीला माझ्याकडे राहू दे. मी तिची पुढची सर्व व्यवस्था करतो.''

धोबी रत्नावतीला राजाकडे ठेवून परत नदीवर आला. येऊन बघतो, तर त्या उघड्या पेटीत झाडावरची माकडीण येऊन बसली होती. धोब्याला वाटले की, आता गंमत करावी. त्याने पटकन त्या पेटीचे झाकण लावले. माकडीण आत अडकली. 'वेंचऽवेंच' करायला लागली. पण धोब्याने तिला बाहेर काढले नाही नाही तरी धोब्याचा त्या माकडिणीवर रागच होता. धोब्याने धुवून वाळत घातलेले कित्येक कपडे आजवर तिने फाडले होते. पळवले होते. तो मनात म्हणाला, 'बरी सापडली!' मग त्याने दुसरे एक कुलूप आणले. त्या पेटीला लावले आणि ती पेटी ओढून

नेऊन नदीत सोडून दिली. पेटी नदीच्या प्रवाहात वाहात जाऊ लागली. तशी धोब्याने टाळ्या पिटल्या.


पेटी वाहात वाहात गेली ती बैराग्याच्या मठीजवळ पोचली. बैराग्याचे चेले तिथे बसले होतेच 'पेटी आली!' म्हणून त्यांनी उड्या मारल्या. ते दोघे पाण्यात उतरले. पोहत जाऊन त्यांनी ती पेटी पकडली आणि तीरावर आणली. दोघांनी दोन बाजूंना धरून त्यांनी ती पेटी बैराग्याच्या मठीत नेली. बैरागी तिथे धुमीजवळ गांजाची चिलीम ओढीत बसला होता. केव्हा एकदा पेटी येते, असे त्याला झाले होते. आपल्या चेल्यांनी पेटी आणलेली पाहताच तो हातातली चिलीम फेकून देऊन उठला. त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. कारण त्याचे कारस्थान यशस्वी झाले होते. आता रत्नावती आपल्याला मिळणार आणि आपण तिला बायको करणार, या कल्पनेने तो हुरळून गेला. त्याने लगेच आपल्या चेल्यांना हुकूम सोडला,

"चेले हो! या पेटीत एक मोठं भूत आहे. ते महा खाष्ट आहे. पेटी उघडताच ते बाहेर पडेल आणि तुमच्या मानगुटीवर बसेल. मग तुमची धडगत नाही. तेव्हा तुम्ही सगळे इथून चालते व्हा. दूर कुठे तरी पळून जा. पंधरा दिवस इकडे फिरकू नका. भूत भयंकर आहे. मी मंत्राचा जप करून त्याला ताळ्यावर आणणार आहे. हे काम मला एकट्यानेच करायला हवे. भूत वठणीवर आलं, मी सांगेन तसं वागायला लागलं, म्हणजे मग मी तुम्हांला बोलावीन. चला! क्षणभरही इथं थांबू नका."

चेल्यांना नवल वाटले. आपल्या गुरूच्या बोलण्याचा त्यांना अर्थच कळेना. पण ते बैराग्याच्या हुकमाचे ताबेदार होते. त्याची आज्ञा होताच ते सगळे तिथून निघून गेले. मग बैरागी म्हणाला, ' बस्स ! आता मी आणि रत्नावती. '

त्याने मग लगेच एक दगड आणला. तो त्या कुलपावर घातला. त्यासरशी कुलूप तुटले. बैराग्याला हर्षाच्या उकळ्या फुटल्या. त्याने लगेच झाकण उघडले. त्याला वाटले होते की, आता आपण रत्नावतीला हळूच बाहेर काढू.

पण झाले भलतेच ! झाकण उघडताच आतली माकडीण चवताळून बाहेर पडली. आपल्याला पेटीत कोंडल्याचा तिला



माकडिणीने बैराग्यावर हल्ला चढविला.

भयंकर राग आला होता. तिने जी उडी घेतली, ती नेमकी बैराग्याच्या छातीवर. ती बैराग्याची मानगूट पकडून त्याला

नखांनी ओरबाडू लागली. तिने बैराग्याचे सगळे तोंड सोलून काढले.

ती तेवढ्यावरच थांबली नाही. तिने त्याच्या कानाला, नाकाला, हातांना, पोटाला कचकचून चावे घेतले. बैरागी उभा होता तो एकदम आडवा पडला. कोणाला हाक मारावी तर आजूबाजूला चिटपाखरू नव्हते. चेले सगळे निघून गेलेले. अशा स्थितीत त्याला काही म्हणजे काहीच करता आले नाही. माकडिणीने त्याची अशी दुर्दशा केली आणि ' केंच केंच ' करीत ती एका झाडावर चढली. थोड्याच वेळात या झाडावरून त्या झाडावर अशा उड्या मारीत ती आपल्या मूळच्या रानात परत आली.

इकडे रत्नावती त्या राजाच्या राजवाड्यात आनंदाने राहू लागली. राजाला ती आवडली, तशीच राणीलाही आवडली. तिचे बोलणे गोड होते. वागणे चांगले होते. त्यामुळे राजवाड्यातली सगळी माणसे तिचे कौतुक करू लागली.

राजाला एक मुलगा होता. मोठा देखणा आणि रुबाबदार राजा-राणी त्याचे लग्न करण्याच्या विचारात होती. पण अजून त्यांना मनाजोगती मुलगी मिळाली नव्हती. रत्नावतीसारखी एक गोड आणि विनयशील मुलगी आपल्या पायांनी घरी आलेली पाहताच राजा-राणीला मोठा आनंद झाला. त्यांनी तिला आपली सून करून घ्यायचे ठरवले. त्याप्रमाणे रत्नावतीच्या बापाला बोलावणेही पाठवले.

तो सावकार आपल्या बायकोसह लगबगीने राजाकडे आला. आपली मुलगी सुखरूप असलेली पाहून त्याला खूप आनंद झाला. आणि आता तर राजा तिला आपली सून करून घेणार होता. रत्नावती त्या राज्याची युवराज्ञी होणार होती. मग काय विचारता ! सावकाराचा आणि त्याच्या बायकोचा हर्ष गगनात मावेना.

आपल्या मुलीला सून करून घ्यायचे ठरवल्याबद्दल सावकाराने राजाचे आभार मानले. उभयतांच्या संमतीने लग्नाचा मुहूर्त ठरला. वाजंत्री वाजू लागली. मोठा समुदाय जमला. रत्नावती आणि युवराज यांना समोरासमोर उभे करून राजपुरोहितांनी दोघांच्यामध्ये अंतरपाट धरला. मंगलाष्टके सुरू झाली.

भटजी इकडे मोठ्याने मंगलाष्टके म्हणत होते, तर त्याच वेळी बैरागी आपल्या मठीत ' हाय ओ ऽ य ' करीत कण्हत होता. घोटभर पाणी द्यायलासुद्धा त्याच्याजवळ कोणी नव्हते. रत्नावतीच्या बाबतीत त्याने जो दुष्टपणा केला त्याचे त्याला पुरेपूर प्रायश्चित्त मिळाले होते.



# यज्ञसोम आणि कीर्तिसोम

पाटण नावाच्या नगरात दोन भाऊ राहात होते. थोरल्याचे नाव होते यज्ञसोम आणि धाकट्याचे नाव होते कीर्तिसोम. एकाच बापाचे दोन मुलगे. सख्खे भाऊ. पण दोघांच्या स्वभावात खूप फरक होता. कीर्तिसोम कृपण होता. 'चामडी देईन पण दमडी देणार नाही' अशी त्याची वृत्ती होती. तो खाण्यापिण्यातसुद्धा काटकसर करी. स्वतः अर्धपोटी राही आणि बायकामुलांनी जास्त खाल्ले तर त्यांना रागे भरे. हाती आलेला पैसा खर्च न होता शिल्लक कसा पडेल याचीच त्याला चिंता होती.

यज्ञसोम अगदी याच्या उलट होता. त्याच्या घरी खाण्यापिण्याची चंगळ असे. त्याच्याकडे आप्त येत, मित्र येत, पाहुणे येत आणि अतिथी पण येत. त्या सगळ्यांना तिथे भरपूर खायला-जेवायला मिळे. कोणी अडला पडला माणूस हात पसरून

पुढे आला तर यज्ञसोम त्याला मदत करी. कोणाला कपडा दे, कोणाला धान्य दे, कोणाला पैसा दे असे त्याचे दोन्ही हातांनी दान देणे चालू होते.

कीर्तिसोमच्या घरी कोणी विशेषसे जात-येत नसे. तर यज्ञ-सोमाच्या घरी सतत लोकांची ये-जा चालू असे. त्याच्या बापाने व्यापारधंदा करून खूप पैसा मिळवला होता. मरतेवेळी त्याने आपली सगळी धनदौलत दोन्ही भावांना सारखी वाटून दिली होती. कीर्तिसोमाने सावकारी करून आणि देणेकऱ्यांकडून जबर व्याज वसूल करून आपले धन किती तरी पटींनी वाढवले होते. पण यज्ञसोम मात्र दिवसेदिवस खालावत होता. त्याच्याकडचे धन दिवसादिवसाने, महिन्यामहिन्याने कमी कमी होत होते. बायको त्याला वेळोवेळी हात राखून खर्च करण्याबद्दल बजावीत असे, पण त्याला ते पटायचेच नाही. त्याला गरीब-दुबळ्यांची दया यायची आणि तो हातात असेल ते देऊन टाकायचा.

करता करता एक दिवस असा आला की, यज्ञसोमाच्या घरात खायला अन्नच शिल्लक उरले नाही. बायको त्याला म्हणाली की 'आता कुठून तरी शेरभर धान्य मागून आणा.' यज्ञसोम म्हणाला की, 'मी कोणाकडे मागायला जाणार नाही.' बायको म्हणाली, की 'आता उपासच काढायचे का?' यज्ञसोम म्हणाला,

" उपास काढून जगणार कसे? आपण कुठे तरी देशांतराला

जाऊ गावात भिक्षा मागण्यापेक्षा परदेशी कसलाही धंदा करून पोट भरणं चांगलं."

"गावाला जायचं म्हटलं तरीसुद्धा हातखर्चाला काही पैसे लागतील. तुम्ही भावाकडे चला आणि त्याच्याकडून काही रुपये मागून आणा."

ते ऐकून यज्ञसोम 'बरे' म्हणाला आणि भावाच्या घरी गेला. भावाने विचारले की 'का आलास?' यज्ञसोम म्हणाला, 'मला थोडे पैसे हवेत. मी देशांतराला चाललो आहे.'

"तू देशांतराला जाणार! मग तुला दिलेले पैसे परत मिळायची आशा नको. छे बाबा! माझ्याकडून तुला एक पै-सुद्धा मिळायची नाही."

यज्ञसोम निराश होऊन परत आला. बायको म्हणाली की 'असे कष्टी होऊ नका. भिक्षा तर आहे ना? आपण जाऊ कशी तरी!' आणि खरोखरच यज्ञसोमाच्या बायकोने भिक्षा-पात्र हाती घेतले.

ती दोघे गावोगाव मुक्काम करीत निघाली. एखाद्या गावात जायचे, तिथे भिक्षा मागायची, तिथल्या धर्मशाळेत जायचे आणि तिथे अन्न शिजवून खायचे. रात्री मुक्काम दुसऱ्या गावी. असा त्यांचा प्रवास सुरू झाला. रडतखडत, दमतभागत ती दोघे सारखी पुढे पुढे चालली होती. जाता जाता त्यांना वाटेत एक रान लागले. त्या रानात वाघ, अस्वले, लांडगे असे हिंस्र पशू हिंडत होते. वानर हुप्ऽऽहुप् करीत झाडांवर

झेपावत होते. जीव–जिवाणू सरपटत होते. माणूस मात्र कुठे दिसत नव्हता. या जंगलातून कसेबसे एकदा पार पडले पाहिजे, अशा विचाराने ती दोघे भयभीत मनाने तो रानाचा रस्ता कापीत होती.

पण इतकी सावधगिरी घेऊनही संकट यायचे ते आलेच ! दुर्दैव ओढवायचे ते ओढवलेच ! त्यांना कल्पनाही नसताना एक भला मोठा अजगर समोरून सर्ऽसर् सरपटून यज्ञसोमाच्या पुढे आला. एखाद्या सागवानासारखा तो अंगाने मोठा अन् लांब होता. त्याच्या अंगावर डोक्यापासून शेपटीपर्यंत रंगीत चट्टे होते. झटकन त्याने यज्ञसोमाच्या पायाला विळखा घातला. त्यासरशी यज्ञसोम एकदम आडवा पडला. लगेच अजगराने आपला भला मोठा जबडा उघडला आणि यज्ञसोमाला गिळायला सुरुवात केली. बिचारी यज्ञसोमाची बायको ! ती एकदम ओरडली आणि ताठ डोळ्यांनी नुसती बघतच राहिली.

अजगराने यज्ञसोमाचे पाय गिळले. मग कंबर गिळली. मग छाती गिळली. आणि हां हां म्हणता त्याचे डोकेही गिळून टाकले. अजगर तट्ट फुगला. यज्ञसोमाच्या हातात भिक्षापात्र होते तेही यज्ञसोमाच्या बरोबरच अजगराच्या पोटात गेले. मग त्या अजगराने तिथेच वेटोळे केले. आता तो तिथे निपचित पडून राहणार होता. आपला नवरा असा एकाएकी अदृश्य झालेला पाहून यज्ञसोमाची बायको धाय मोकलून, ऊर पिटून रडू लागली.

" देवा रे ! आता मी कुठं जाऊ ? कोण माझं रक्षण करील ? कोण माझी चिंता वाहील ? "

अजगराने तिचा हा विलाप ऐकला आणि आश्चर्य म्हणजे तो मनुष्यवाणीने बोलू लागला,

" बाई ! तू विलाप का करतेस ? मी तुला खाणार नाही. तू कुठेही जा, तुझी वाट अडवीत नाही. "

त्यावर यज्ञसोमाची बायको म्हणाली,

" मला जा म्हणतोस ? पण मी कुठे जाऊ ? काय खाऊ ? माझं भिक्षापात्रसुद्धा तू गिळून टाकलंस. "

अजगर म्हणाला,

" भिक्षापात्राची चिंता करू नकोस. हे घे तुझं भिक्षापात्र."

असे म्हणून अजगराने 'बकू' करून एक पात्र ओकून बाहेर टाकले. ते भिक्षापात्र तांब्या-पितळेचे नव्हते; तर सोन्याचे होते. यज्ञसोमाच्या बायकोला त्याचे आश्चर्य वाटले. तिने ते पात्र हातात घेऊन निरखून पारखून पाहिले. ती अजगराला म्हणाली,

" बाबा रे ! सोन्याचं भिक्षापात्र घेऊन मी भीक मागायला गेले तर मला भीक तर कोणी घालणार नाहीच; उलट माझ्या हातातलं हे भिक्षापात्र मात्र कोणीही हिरावून घेईल."

अजगर म्हणाला,

" तसं होणार नाही. मी तुला एक वर देतो. तू भिक्षा मागितल्यानंतर जो कोणी तुला भिक्षा नाही म्हणेल, त्याचं मस्तक त्याच क्षणी तुटून पडेल. "

यज्ञसोमाच्या बायकोनं हा वर नीट ऐकला. ती शहाणी होती. चलाख होती. तिने मनात म्हटले, की आता या अजगराचे दात याच्याच घशात घालू या. लगेच ती ते भिक्षापात्र उताणे हातात धरून दोन पावले पुढे गेली अन् त्या अजगराला म्हणाली,



अजगराकडे नवऱ्याची भीक मागते.

"अजगर राजा! मला माझ्या नवऱ्याची भिक्षा वाढ."

आता आश्चर्यचकित होण्याची पाळी अजगरावर आली. तो म्हणाला, की या बाईला वर दिला तो आपल्याच अंगाशी आला. हिला भिक्षा नाही म्हणावे तर आता माझेच मस्तक तुटून पडेल. तो मग तिला म्हणाला,

"बाई! तू मला पेचात धरलेस. माझा वर माझ्यावरच उलटवलास. तू मोठी चतुर आहेस. हा घे तुझा नवरा."

असे म्हणून अजगर पुन्हा एकदा बकदिशी ओकला. त्या-

सरशी यज्ञसोम सगळाच्या सगळा त्याच्या पोटातून बाहेर आला. तो अजगराच्या पोटात जाऊनही अजून मेला नव्हता. त्याला फक्त मूर्च्छा आली होती. बायकोने त्याचे हात-पाय खाली-वर केले. डोके जरा चोळले, थोपटले. त्यासरशी तो शुद्धीवर आला.

यज्ञसोम उठून बसतो न बसतो तोच तो अजगर नाहीसा झाला आणि त्याच्या जागी एक देखणा तरुण पुरुष उभा राहिला. या प्रकाराचे त्या दोघांनाही आश्चर्य वाटले. ती दोघे चकित नजरेने आपल्याकडे बघत आहेत, असे पाहून तो देखणा पुरुष त्यांना म्हणाला,

" मी विद्याधरांचा राजा आहे. माझे नाव कांचनवेग. माझ्या हातून एक अपराध घडला आणि त्यामुळे गौतम महर्षींने मला



अजगराच्या जागी देखणा पुरुष उभा राहिला.

शाप दिला. त्यामुळे मी अजगर होऊन या रानात पडलो. मी

गौतम महर्षींचे पाय धरून त्यांच्याकडे उःशाप मागितला. तेव्हा तो म्हणाला, ‘एखाद्या साध्वी स्त्रीशी जेव्हा तुझं संभाषण होईल तेव्हा तू शापातून मुक्त होशील.’ हे यज्ञसोमा ! तुझी बायको साध्वी पतिव्रता आहे. तिच्याशी बोलायचा आज मला योग आला आणि मी पुनश्च विद्याधर झालो. तुम्ही दोघे या रानातून आलात म्हणून माझा उद्धार झाला.”

असे म्हणून त्या विद्याधराने त्या दोघांना नमस्कार केला. ते सोन्याचे भिक्षापात्र तिथे जमिनीवरच होते. विद्याधराने आपल्या-जवळची बहुमोल हिरेमाणके त्या भिक्षापात्रात ओतली. त्याने तें पात्र शिगोशीग भरले आणि यज्ञसोमाच्या हाती दिले. तो म्हणाला,

“ब्राह्मणा, ही मी दिलेली भेट तू स्वीकार. यांतल्या एकेका रत्नाची किंमत हजारो रुपये भरेल. या रत्नांनी तुझं पुढच्या सात पिढ्यांचं दारिद्र्य दूर होईल.”

यज्ञसोमाने ती रत्ने घेतली. त्या दोघांना खूप आनंद झाला. ती दोघे परत आपल्या घरी आली. त्यांनी मोठा थोरला वाडा बांधला. गाड्या-घोडी घेतली. दानधर्म सुरू केला. आणि ती दोघे आपल्या मुलां-नातवांसह सुखाने आयुष्य घालवू लागली.

2020
BVBK-0402828